सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २१० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### बिहारमध्ये एनडीएला मोठा विजय मिळेल यात शंका नाही- पंतप्रधान



पाटणा, ४ नोव्हेंबर : मला याबद्दल अजिबात शंका नाही की बिहारमध्ये एनडीएला प्रचंड विजय मिळेल, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहार विधानसभेच्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या प्रचार मोहिमेच्या अखेरच्या दिवशी (मंगळवारी) राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) महिला कार्यकर्त्यांशी संवाद साधताना केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, निवडणूक सभांमध्ये महिलांची विक्रमी उपस्थिती दिसत आहे. त्या उत्साहाने घोषणा देत आहेत. मोदी पुढे म्हणाले की, मला याबद्दल अजिबात शंका नाही की बिहारमध्ये एनडीएला प्रचंड विजय मिळेल. पंतप्रधानांनी महिला कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त मतदान सुनिश्चित करण्याचे आवाहन केले. हा संवाद भारतीय जनता पक्षाच्या 'मेरा बूथ, सबसे मजबूत' या उपक्रमाच्या अंतर्गत झाला. यावेळी पंतप्रधान मोदींनी महिला कार्यकर्त्यांना हेही आवाहन केले की,बिहारच्या निवडणुकीत 'जंगलराज'च्या समर्थकांना आतापर्यंतची सर्वात मोठी पराभवाची चव चाखावी लागली पाहिजे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, एनडीए सरकार महिलांचे जीवन अधिक सुलभ बनवण्यासाठी आणि त्यांना सशक्त करण्यासाठी वचनबद्ध आहे.

### मंत्रिमंडळ बैठकीत २१ महत्त्वाच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब!

मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या विकासाच्या दृष्टीने २१ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, आजच्या बैठकीत काही विशिष्ट मुद्द्यांवरून मंत्र्यांमध्ये चांगलीच खडाजंगी झाली होती. मात्र, वादळी चर्चेनंतरही सर्वानुमते हे २१ निर्णय मंजूर करण्यात आले. या निर्णयांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेला निर्णय सर्वात महत्त्वाचा आणि मोठा ठरला. सरकारने महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना या निर्णयाची माहिती दिली, या योजनेत आता विविध प्रकारच्या तब्बल २४०० आजारांसाठी उपचारांना मान्यता देण्यात आली आहे. यापैकी २३९९ आजारांसाठी राज्यातील नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार उपलब्ध होणार आहेत. तसेच, ज्या काही गंभीर आजारांसाठी अधिकचा खर्च होत आहे, त्यासाठी १० लाख रुपयांपर्यंत मदत देण्याचा निर्णयही शासनाने घेतल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### उद्धव सरकारने गमावलेला ओबीसींचा हक्क महायुतीने मिळवला - बावनकुळे

मुंबई, ४ नोव्हेंबर -महाराष्ट्रातील ओबीसी समाजासाठी २७ टक्के राजकीय आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाल्याबद्दल महसूलमंत्री व ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष म्हणून चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. ते म्हणजे, फडणवीस यांच्या व्यक्तिगत प्रयत्नांमुळे सुप्रीम कोर्टात ओबीसी आरक्षणाची बाजू यशस्वीपणे मांडली गेली, ज्यामुळे निवडणुकीला परवानगी मिळाली. ओबीसींचे २७ टक्के आरक्षण उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या काळात गमावले होते, मात्र राज्यात शिंदे-फडणवीस-पवार यांचे महायुतीचे सरकार आल्यानंतर, तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी जातीने लक्ष घातले. सरकारच्या वकिलांनी सुप्रीम कोर्टात प्रभावीपणे बाजू मांडली, ज्यामुळे २७ टक्के आरक्षणासह निवडणुका घेण्यास कोर्टाने हिरवा कंदील दिला.

# नगरपरिषद व नगरपंचायती निवडणुका जाहीर

मुंबई, ४ नोव्हेंबर : दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर महाराष्ट्रातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिल्या टप्प्यातील या निवडणुकीसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार असून, मतमोजणी ३ डिसेंबरला पार पडेल. अधिकृत निकाल १० डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येतील.

राज्य निवडणूक आयुक्तांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देताना सांगितले की, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद व महानगरपालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम नंतर जाहीर केला जाईल.

**अर्ज प्रक्रिया आणि वेळापत्रक**

उमेदवारांना अर्ज दाखल करण्यासाठी १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर अशी मुदत दिली असून, अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होईल. अर्ज माघारी घेण्याची अंतिम तारीख २१ नोव्हेंबर, तर आक्षेप नोंदविलेल्या ठिकाणी २५ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. उमेदवारांची अंतिम यादी व चिन्हवाटप २६ नोव्हेंबर रोजी करण्यात येईल.

**निवडणुकीचा आवाका**

या निवडणुकीत राज्यातील एकूण २४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपंचायतीसाठी मतदान होणार असून, यामधून ६,८४९ सदस्य आणि २८८ अध्यक्ष निवडले जाणार आहेत. यंदा १० नवीन नगरपरिषद आणि १५ नवीन नगरपंचायतींचा समावेश झाला आहे.

राज्यातील १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार या निवडणुकीत सहभागी होणार असून, १३,३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच १३,७२६ कंट्रोल युनिट आणि २७,४५२ बॅलेट युनिटची तयारी करण्यात आली आहे.

**डिजिटल सुविधा**



मतदारांना सुलभतेने माहिती मिळावी म्हणून आयोगाने विशेष मोबाईल ॲप व संकेतस्थळ उपलब्ध करून दिले आहे. या माध्यमांतून मतदारांना आपले नाव, मतदान केंद्र, उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र, शैक्षणिक पात्रता, गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि आर्थिक स्थितीची माहिती पाहता येणार आहे.

**उमेदवारांच्या खर्च मर्यादा**

निवडणुकीच्या पारदर्शकतेसाठी आयोगाने खर्च मर्यादेत वाढ केली आहे.

अ वर्ग नगरपरिषद - अध्यक्ष: १५ लाख, सदस्य: ५ लाख

ब वर्ग नगरपरिषद - अध्यक्ष: ११.२५ लाख, सदस्य: ३.५० लाख

क वर्ग नगरपरिषद - अध्यक्ष: ७.५० लाख, सदस्य: २.५० लाख

नगरपंचायत - अध्यक्ष: ६ लाख, सदस्य: २.२५ लाख

**जिल्हानिहाय निवडणुका**

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या यादीप्रमाणे पालघरपासून गडचिरोलीपर्यंत सर्व जिल्ह्यांतील नगरपरिषद व नगरपंचायतींचा समावेश या निवडणुकीत आहे. मुंबई व काही महानगरपालिकांशिवाय संपूर्ण महाराष्ट्रातील नागरी भागात लोकशाहीचा हा उत्सव रंगणार आहे.

राज्यभरातील प्रमुख राजकीय पक्षांनी या निवडणुकीसाठी आपापल्या तयारीला वेग दिला असून, स्थानिक पातळीवर प्रचारयंत्रणा सज्ज झाली आहे. या निवडणुका राज्याच्या राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकणार असल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.

## मालगाडीवर चढली पॅसेंजर ट्रेन; ६ जणांचा मृत्यू



बिलासपूर, ०४ नोव्हेंबर : छत्तीसगडच्या बिलासपूरमध्ये आज, मंगळवारी एक भीषण रेल्वे अपघात झाला आहे. कोरबा पॅसेंजर ट्रेन आणि मालगाडी यांची जोरदार टक्कर होऊन या दुर्घटनेत ६ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. घटनेच्या ठिकाणी रेल्वेचे अधिकारी आणि कर्मचारी पोहोचले असून रिस्क्यू ऑपरेशन सुरू आहे. मात्र, हा अपघात नेमका कसा झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यासंदर्भातील माहितीनुसार, ही घटना मंगळवारी दुपारी सुमारे ४ वाजता घडली. रेल्वे प्रशासनाने सर्व साधनसामग्री आणि मदतपथक घटनास्थळी पाठवले आहे. जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात आली आहे. रेल्वेच्या अधिकृत निवेदनात सांगण्यात आले आहे की, अपघातानंतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत आणि रिस्क्यू मोहीम युद्धपातळीवर सुरू आहे. अपघातानंतर लगेचच मेडिकल युनिट आणि विभागीय अधिकारी घटनास्थळी रवाना झाले. सध्या या मार्गावरील रेल्वे वाहतूक थांबवण्यात आली असून, अनेक पॅसेंजर आणि एक्सप्रेस गाड्या वळवण्यात आल्या आहेत.

## राज्यात रहिवासी क्षेत्रासाठी तुकडेबंदी कायदा रद्द - बावनकुळे

मुंबई, ४ नोव्हेंबर : राज्यातील नागरी भागातील तसेच प्रादेशिक योजनांमधील बिगर शेती वापर अनुज्ञेय क्षेत्रावरील जमिनींसाठी तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. याबाबत राज शासनाने नुकताच एक अध्यादेश जारी केला असून या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५ पासून तुकडेबंदी कायद्यामुळे अडकलेली घरे आणि प्लॉट कायदेशीर करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात पत्रकार परिषदेत दिली.

या निर्णयासंदर्भात अधिक माहिती देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या अध्यादेशानुसार दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अशा तुकड्यांच्या



खरेदी-विक्री व्यवहारांना आता कोणतेही शुल्क न आकारता नियमित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयाचा राज्यातील ४९ लाख परिवारांना लाभ होणार आहे.

राज्यात सध्या अंमलात असलेला तुकडेबंदी कायदा हा कृषी क्षेत्रासाठी लागू आहे. या कायद्यानुसार बागायत किंवा जिरायत जमिनींसाठी ठराविक प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. परंतु, वाढत्या नागरीकरणामुळे अनेकांनी शहर व गावांच्या सभोवतालच्या भागात आपल्या गरजेपोटी या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे व्यवहार केले आहेत. अशा व्यवहारांना आतापर्यंत कायदेशीर दर्जा मिळालेला नव्हता. यास्तव राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी तुकडेबंदी कायद्यावरील सुधारित अध्यादेश जारी केला असून त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे.

हा निर्णय महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या हद्दीतील क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (एमएमआरडीए, पीएमआरडीए, एनएमआरडीए) ग्रोथ सेंटर्स आणि विशेष नियोजन प्राधिकरणांतील क्षेत्र, तसेच युडीसीपीआरअंतर्गत शहर/गावांच्या परिघातील क्षेत्रांना लागू होणार आहे. ज्या जमिनींचे व्यवहार नोंदणीकृत आहेत पण ७/१२ उताऱ्यावर नावे नोंदलेली नाहीत, त्यांची नावे आता मालकी हक्क म्हणून नोंदवली जातील. तर नोंदणीकृत नसलेले (नोटरीद्वारे केलेले) व्यवहार असलेल्यांनी संबंधित सब-रजिस्ट्रार कार्यालयात नोंदणी करून आपले हक्क नोंदवता येतील,असेही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले महसूल विभागामार्फत याबाबत लवकरच सविस्तर कार्यपद्धती तयार करून सर्व विभागीय आणि जिल्हा स्तरावरील कार्यालयांना मार्गदर्शक सूचना देणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो नागरिकांना दिलासा मिळून जमिनींच्या मालकी हक्कांचे प्रश्न सुटणार असल्याचा विश्वासही महसूल मंत्री बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.






## ड्रग ओव्हरडोजमुळे दर आठवड्याला १२ जणांचा मृत्यू

### एनसीआरबीच्या अहवालात पुढे आली धक्कादायक माहिती

नवी दिल्ली, ४ नोव्हेंबर : ड्रग ओव्हरडोजमुळे देशभरात दररोज काही लोकांचा जीव जात आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोने (एनसीआरबी) यासंदर्भात ताजे आकडे जाहीर केले आहेत. देशात २०१९ ते २०२३ या कालावधीत झालेल्या ड्रग ओव्हरडोजमुळे झालेल्या मृत्यूंचा यात उल्लेख आहे. या अहवालानुसार, देशात दर आठवड्याला १२ लोकांचा मृत्यू ड्रग ओव्हरडोजमुळे होतो.

एनसीआरबीच्या माहितीनुसार, २०२३ मध्ये दर आठवड्याला सरासरी १२ लोकांचा मृत्यू ड्रग ओव्हरडोजमुळे झाला आहे. तसेच २०१९ ते २०२३ या कालावधीत दररोज सुमारे २ जणांचा मृत्यू ड्रग ओव्हरडोज हीच मुख्य कारण ठरली आहे. तथापि, या अहवालात फक्त ड्रग ओव्हरडोजमुळे झालेल्या निश्चित (कन्फर्म) मृत्यूंचाच समावेश करण्यात आला आहे. ड्रग ओव्हरडोजशी संबंधित अनेक प्रकरणे नोंदवली जात नाहीत, त्यामुळे त्या आकडेवारीचा समावेश एनसीआरबीच्या अहवालात नाही.

प्रारंभीच्या आकडेवारीनुसार, तमिळनाडू या राज्यात ड्रग ओव्हरडोजच्या



सर्वाधिक घटना नोंदल्या गेल्या होत्या, परंतु आता तेथील प्रकरणांमध्ये घट दिसून येत आहे. तसेच २०१९ मध्ये तमिळनाडूमध्ये ड्रग ओव्हरडोजमुळे १०८ लोकांचा मृत्यू झाला होता, तर २०२३ मध्ये हा आकडा घटून ६४ वर आला आहे.

दुसरीकडे, २०१९ मध्ये पंजाब या राज्याचे नाव टॉप ५ राज्यांमध्ये नव्हते, पण २०२२ मध्ये पंजाबमध्ये ड्रग ओव्हरडोजमुळे तब्बल १४४ लोकांचा मृत्यू झाला. तर २०२३ मध्ये हा आकडा घटून ८९ इतका नोंदवण्यात आला आहे.

## लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात आता विकासाची नवी गरुड झेप

### आ. चिखलीकर यांच्या प्रयत्नातून ३० कोटींच्या कामांचे आज भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ४ नोव्हेंबर-**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात आणि आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नातून लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाच्या विकासाची नवी गरुड झेप सुरू आहे. या भागातील सर्वांगीण विकासासाठी निधी उपलब्ध करून देत असतानाच आता केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत कंधार तालुक्यातील रस्ते विकासासाठी तब्बल ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आज या विकास कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची सातत्याने प्रयत्न सुरू आहेत . लोहा आणि कंधार नगरपालिके अंतर्गत विकास कामासाठी नुकताच २२ कोटीचा रुपयांचा निधी मंजूर करून घेतल्यानंतर आता या भागातील रस्ते विकासासाठी ही आ. चिखलीकर यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत कंधार तालुक्यातील धानोरा- कौठा -सिरसी- पेटवडज -रुई या प्रमुख जिल्हा मार्गाच्या विकासासाठी आणि कौठा गावाजवळ मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी तब्बल ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे .या मंजूर निधीतील कामाचे भूमिपूजन बुधवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता कौठा तालुका कंधार येथे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या भूमिपूजन सोहळ्याला माजी आमदार मोहनराव हंबर्डे , माजी आमदार अविनाशराव घाटे, माजी आमदार सुभाषराव साबणे , माजी जिल्हा परिषद सदस्या प्रणिताताई देवरे - चिखलीकर , राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर शिवराज पाटील होटाळकर जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, माधव पावडे कार्याध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस , ड. मुक्तेश्वर धोंडगे प्रदेश सघंटक सचिव , सुरेश राठोड प्रदेश सचिटणीस ओ.बी.सी, संजय देशमुख उप सभापती कृ.उ.बा.स. कंधा , स्वप्निल लुंगारे माजी नगराअध्यक्ष कंधार , जफरोदिन बाहोदिन माजी उपनगराअध्यक्ष कंधार , रामकृष्ण गळधर कार्यकारी अभियंता सा.बा वि, रामेश्वर गोरे , आर पी चव्हाण कार्यकारी अभियंता महावितरण, महेश पाटील गटविकास अधिकारी कंधार , सुमित पाटील उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, डी व्ही बस्वदे उप अभियंता जि.प. उपविभाग कंधार , डी.व्ही बनसोड उप अभियंता पा.पु. कंधार , सचिन पाटील चिखलीकर माजी सरपंच चिखली , बाबुराव देशमुख कौठा , शंकर अण्णा देशमुख कौठा , किशनराव डफडे चेअरमन खरीदी विक्री संघ कंधार , बाबुराव उमरगेकर माजी सभापती , सौ अर्चनाताई देशमुख सरपंच कौठा , रामदास कापसे कौठा , शंकरराव नाईक बारुळ , सुधाकर कौशल्य उपसभापती कृ.उ.बा.स. कंधार , मनोहर भोसीकर तालूका अध्यक्ष रा.कॉ.कंधार , निलेश गौर कंधार यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित करण्यात आलेल्या भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्री स्वामी समर्थ केंद्र बिडकीन येथे वधू वर परिचय मेळावा व रक्त दान शिबीर संपन्न



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३ नोव्हेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ केंद्र बिडकीन दिंडोरी प्रणित परमपूज्य गुरुमाऊली यांच्या आशीर्वादाने व गुरुपुत्र आबासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व जातीय धर्मीय उपवर वधू वर परिचय मेळावा व नाव नोंदणी तसेच महाराष्ट्र ब्लड सेंटर या रक्तपेढीने ३० जणांचे रक्त संकलन केले या कार्यक्रमाचे उद्घाटक बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके व प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मीकांत भाले, विवाहप्रतिनिधी यांनी दिप प्रज्वलीत करून कार्यक्रमाची सुरुवात केली छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील अनेक पालकांनी नावनोंदणी केली प्रसंगी नरेंद्र खिस्ती, पाठक, हूरपुडे, जाधव, विष्णू बोबडे, नानासाहेब मुळे, डॉ त्र्यंबक पाडळकर, मनोज खराडकर. लिलावती भूमकर, राजाराम खरात यांची उपस्थिति होती.

## मातृ आणि बाल आरोग्य सेवांना बळकटी दिली

टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) यांनी उत्तराखंड राज्यातील ऊधमसिंग नगर जिल्ह्याच्या खटीमा ब्लॉकमध्ये आरोग्यसेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. कंपनीने खटीमा उपजिल्हा रुग्णालय तसेच देवरी आणि चकरपूर या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय आणि सहाय्यक उपकरणे बसवली आहेत, ज्यामुळे सुमारे ३ लाख लोकांना याचा लाभ होणार आहे.ही योजना टीकेएमच्या वित्त वर्ष २०२५-२६ मधील कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमाचा एक भाग आहे, ज्याअंतर्गत कंपनी आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि सामुदायिक विकास अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सातत्याने योगदान देत आहे. उत्तराखंड सरकारसोबत करण्यात आलेल्या सामंजस्य कराराअंतर्गत सुरू केलेल्या या व्यापक उपक्रमामुळे राज्यभरातील सुमारे ३.७ लाख लोकांना लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

## अमेरिकन टुरिस्टरने नवीन मोहीम सुरू केली

मुंबई : अमेरिकन टुरिस्टरने मेड इन नाशिक. फॉर द वर्ल्ड ही त्यांची नवीन मोहीम सुरू केली आहे, हा चित्रपट ब्रँडच्या जागतिक प्रवासामागील शहराचे वर्णन करतो. ब्रॅण्डची जगातील सर्वात मोठी फॅक्टरी असलेल्या नाशिकमध्ये, कारागिरी आणि कौशल्य जिवंत आहे. ही मोहीम म्हणजे अमेरिकन टुरिस्टरच्या जागतिक प्रवासाला आयकॉन म्हणून बळ देणाऱ्या अभिमानाला, व्याप्तीला आणि लोकांना दिलेली आदरांजली आहे.नाशिक प्लांटमधील कामगारांच्या दृष्टिकोनातून चित्रित केलेला हा टीव्हीसी - जिथे हस्तकलेच्या निर्मितीतील अचूकता, नाशिकच्या चैतन्यशील कला आणि संस्कृतीमध्ये अखंडपणे मिसळते - नदीकाठापासून बाजारांपर्यंत, ढोलाच्या तालापासून पैठणीच्या सौंदर्यापर्यंत - ही मोहीम प्रत्येक तपशीलात नाशिकचे मनोगत टिपते. या कथेत शहरातील कारागिरीची खोलवर रुजलेली परंपरा दररोज फॅक्टरीतून कशी पसरते हे दाखवले आहे, जी ब्रँडला पुढे नेणाऱ्या लोकांच्या चिकाटीने साकारली आहे.

## सणासुदीच्या कर्जांमध्ये २७% वाढ नोंदविली;

छत्रपती संभाजीनगर : भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील, नॉन-बँकिंग कर्जदाता कंपनी आणि बजाज फिनसर्व्हचा भाग असलेल्या बजाज फायनॅन्स लिमिटेडने आज सांगितले की, यंदाच्या सणासुदीच्या मोसमात त्यांना ग्राहकोपयोगी वस्तूंच्या कर्जांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यांनी यावेळी विक्रमी उपभोक्ता कर्जे वितरित केली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत प्रमाणात २७% आणि मूल्यात २९% जास्त होती.

## बजाज फायनॅन्सने आर्थिक समावेशकतेला दिली गती

अहमदनगर : भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील, नॉन-बँकिंग कर्जदाता कंपनी आणि बजाज फिनसर्व्हचा भाग असलेल्या बजाज फायनॅन्स लिमिटेडने, यंदाच्या सणासुदीच्या मोसमात त्यांना ग्राहकोपयोगी वस्तूंच्या कर्जांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यांनी यावेळी विक्रमी उपभोक्ता कर्जे वितरित केली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत प्रमाणात २७% आणि मूल्यात २९% जास्त होती. ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जांमधील या वाढीतून सरकारच्या नेक्स्ट जनरेशन जीएसटी सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांचा सकारात्मक परिणाम स्पष्ट दिसतो. उपभोक्त्याची खरेदी करण्याची क्षमता वाढविणे हेच या सुधारणांचे लक्ष्य होते.

## स्कोडा ऑटो इंडियाची विक्रमी झेप : १० महिन्यांत वार्षिक विक्रीचा नवा टप्पा



छत्रपती संभाजीनगर, ४ नोव्हेंबर - स्कोडा ऑटो इंडियाने २०२५ या वर्षात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीने जानेवारी ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान तब्बल ६१,६०७ कार विक्री करत, २०२२ मधील ५३,७२१ कार विक्रीचा मागील विक्रम मोडला आहे. ऑक्टोबर महिन्यातच ८,२५२ कार विक्री झाली असून, ही कंपनीच्या इतिहासातील सर्वाधिक मासिक विक्री ठरली आहे.

ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता यांनी सांगितले की, २०२५ मध्ये स्कोडाने भारतात ब्रँडची उपस्थिती बळकट करत विक्रमी प्रगती साधली आहे. उत्पादन विस्तार, स्थानिक बाजाराशी सुसंगत संवाद, ३१८ ग्राहक संपर्क केंद्रांचा विस्तार आणि नव्या प्रदेशांमध्ये वाढलेली उपस्थिती ही या यशाची प्रमुख कारणे आहेत.

स्कोडा आता १८० शहरांमध्ये कार्यरत असून, स्थानिक पातळीवर उत्पादित २ लाखांहून अधिक कार विक्रीचा टप्पा पार केला आहे. कुशक, स्लाव्हिया, कायलॅक आणि कोडियक यांसारख्या मॉडेल्समुळे विक्रीत लक्षणीय वाढ झाली आहे. ग्राहक समाधान आणि सेवा गुणवत्तेसाठी कंपनीने विक्रीनंतरच्या प्रशिक्षण कार्यक्रमात गुंतवणूक वाढवण्याचीही घोषणा केली आहे.

## पंडीत वाघ यांचे निधन



सोयगाव,दि.४ नोव्हेंबर : शहरातील नारळीबाग येथील पंडीत हरी वाघ( वय.९६) यांचे दि.४ मंगळवार रोजी वेळ ११:२५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर मंगळवार रोजी सायंकाळी ४:३० वा.अंत्यसंस्कार करण्यात करण्यात आहे.त्यांच्या पश्चात चार मुले,चार मुली,सुना,नातवंड असा परिवार आहे.भगवान वाघ यांचे वडील तर आरोग्य दूध दिंगाबर वाघ यांचे ते आजोबा होत.

# पैठण नगर परिषद निवडणूकीचा बिगुल वाजला

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०५ :- पैठण सह राज्यातील नगर परिषद, नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूकीचे बिगुल वाजले असून यासाठी राज्य निवडणूक निर्वाचन अधिकारी यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याने पैठण नगर परिषदेसाठी मंगळवार २ डिसेंबर रोजी ईव्हीएमवर मतदान तर ३ डिसेंबर बुधवार रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडून निकाल घोषित कारण्यात येणार आहे.

अनेक वर्षांपासून अडगळीत निवडणूक प्रक्रिया थांबलेल्या पैठण नगर परिषद निवडणूकीचे मार्ग मोकळे झाले आहे. याआधी पैठण निवडणूक अधिकारी एस.डी.एम. नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, न.प. मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ पल्लवी अंभोरे यांच्या मार्गदर्शखाली पैठण नगर परिषद प्रभाग रचना, प्रभाग आरक्षण आणि अंतिम मतदार यादी जाहीर कारण्यात आली आहे.प्रभाग क्रमांक १ मतदार ३४१८ जागा २, आरक्षण,एससी, ओपन महिला. प्रभाग २ मतदार ३२८१ जागा २ ओबीसी, ओपन महिला. प्रभाग ३ मतदार २४५८ जागा २.एसी महिला, ओपन. प्रभाग ४ मतदार २८४२, जागा २,ओबीसी, ओपन महिला. प्रभाग ५ मतदार २८३० जागा २,ओबीसी महिला, ओपन,प्रभाग ६ मतदार ३२८२ जागा २, ओबीसी महिला, ओपन. प्रभाग ७ मतदार ३३३१ जागा २,ओबीसी, ओपन महिला. प्रभाग ८ मतदार ३०२१ जागा २,एससी, ओपन महिला,प्रभाग ९ मतदार १६८० जागा २,ओबीसी महिला, ओपन. प्रभाग १० मतदार ३६३१ जागा २,ओबीसी महिला, ओपन. प्रभाग ११ मतदार २९६५ जागा २,एससी महिला, ओपन. प्रभाग १२ मतदार ४८७० जागा ३, ओपन महिला, ओपन महिला, ओपन.

पैठण शहरातील एकूण १२ प्रभागातील एकूण मतदार ३७ हजार ५४९, एकूण नगरसेवक २५. महिला नगरसेवक १३ आणि नगराध्यक्ष पद हे ओपन महिलेसाठी आरक्षित झाल्याने नगर परिषद सभागृहात यंदा एकूण १४ महिला लोकप्रतिनिधी राहणार आहेत.पैठण नगर परिषद निवडणूक कार्यक्रम नामनिर्देशन पत्र उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात सोमवार १० नोव्हेंबर २०२५. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर,. नामनिर्देशनपत्र छाननी १८ नोव्हेंबर.नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत (अपील नसलेले) २१ नोव्हेंबर. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत (अपील असलेले)२५ नोव्हेंबर.निवडणूक चिन्ह नेमून देण्याचं तसंच अंतिम निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी २६ नोव्हेंबर. मतदानाचा दिवस २ डिसेंबर,मतमोजणी आणि निकालाचा दिवस ३ डिसेंबर २०२५. असा निवडणूक कार्यक्रम राहणार आहे.पैठण नगर परिषद नगराध्यक्ष पदाची जागा ही महिला सर्वसाधारण साठी आरक्षित झाल्याने या जागेसाठी भाजपाकडुन मोहिनी सुरज लोळगे, शिवसेनाकडुन विद्या भूषण कावसनकर, वैशाली ईश्वर परदेशी,सोनाली ताराचंद तावरे, स्वाती तुषार पाटील,ठाकरे गटा तर्फे अपर्णा दत्ता गोर्डे, राखीताई राजू परदेशी, कॉंग्रेस तर्फे सुविद्या योगेश जोशी,हस्णोद्दीन कट्यारे यांच्या सौभाग्यवती, तर राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे कोमल जितू परदेशी, स्वाभिमानी आझाद सेना अतिया विकारोद्दीन कादारी या इच्छुक उमेदवार आहेत.तीर्थक्षेत्र पैठण नगर आपल्या ताब्यात घेण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री रावासाहेब दानवे, खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भुमरे, माजी मंत्री अनिल पटेल, माजी आमदार संजय वाघचौरे,उबाठाचे दत्ता गोर्डे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे,तालुकाध्यक्ष विनोद तांबे, शहराध्यक्ष बंडू आंधळे, जितू परदेशी,निमेश पटेल, उमेश पंडूरे,अंजार कादरी आदी सरसावले आहेत.

# मुक्तेश्वर शुगर मिल्स कारखान्याच्या रु. ३०५० प्रति मे. टन भाव जाहीर

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.४: गंगापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतक-यांसाठी वरदान ठरलेल्या मुक्तेश्वर या साखर कारखान्याचा सोळावा गाळप हंगाम मंगळवार दि. ४/११/२०२५ रोजी ह. भ. प. नारायणनंदगिरी महाराज, श्रीक्षेत्र वैष्णव आश्रम सावखेडा यांचे शुभहस्ते १०.३० वाजता विधीवत पुजा करून गव्हाणीत ऊसाची मोळी टाकुन सुरु करण्यात आला.

मुख्य शेतकी अधिकारी नंदकुमार कुंजर यांनी प्रस्तावीक भाषणात सांगितले की, मुक्तेश्वर साखर कारखान्याने यावर्षी ६५०० हेक्टर आर ऊसाची नोंद केलेली असून कारखान्यास दैनदीन २८०० ते ३००० मे. टन ऊस गाळपास पुरवठा होण्यासाठी ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा भरलेली आहे. कारखान्याचे जेष्ठ संचालक रामचंद्र निरपळ यावेळी म्हणाले की, चालू गळीत हंगामात गाळपास येणा-या ऊसाचे पेमेंट प्रति मे. टन रु. ३०५० तिन हजार पन्नास प्रमाणे शेतक-यांच्या खात्यात जमा होणार आहे. तसेच चालू वर्षी गाळपाचे उद्दीष्ट चार लाख मे. टन ठेवलेले असून सर्व ऊस उत्पादक शेतक-यांनी आपला सर्व नोंदलेला ऊस मुक्तेश्वर साखर कारखान्यास देवून सहकार्य करावे असे आव्हान त्यांनी केले आहे.

ह. भ. प. नारायणनंदगिरी महाराज यांनी सांगितले की, गंगापूर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी यांना मुक्तेश्वर साखर कारखाना गेली पंधरावर्षापासून वरदान ठरलेला आहे. मुक्तेश्वर साखर कारखान्याने आतापर्यन्त ऊस उत्पादक शेतक-याचे व ऊस तोडणी लेवर व वाहतुक कंत्राटदार तसेच कामगार या सर्वांचे पेमेंट वेळेवर केलेले असल्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी व कामगार या सर्वांची प्रगती झालेली आहे. येथूनपूढे अशाप्रकारे मुक्तेश्वर साखर कारखान्याची व ऊस उत्पादक शेतकरी व कमगार सर्वांची अशाच प्रकारे भरभराट व प्रगती होवो अशा आर्शिवाद महाराजांनी दिला.

जयराम दुबीले, धिरज कल्याण शेळके, व गोर्डे, शेतकी अधिकारी यावेळी या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकरी गोरख शेळके, गणेश नवले, विनोद इथापे, ताराचंद दुबीले, राजेद्र शेळके, रायभान शिंदे, दिपक बोरसे, गणेश विधाटे, गणेश शेळके, एकनाथ सुंबर, नारायण काळे, पंढरीनाथ पाठे, गणेश पदार, दत्ता राऊत, भाऊसाहेब म्हस्के, संभाजी गायकवाड, किशोर नरवडे, अशोक निकम, लक्ष्मण निकम शेवगन, संतोष नरवडे, दिपक टेके, मंगलसिंग ठाकुर, दादा शेळके, कारखान्याचे मुख्य अभियंता डिंगंबर अडकिने, रसायन तज्ञ पडीत नंदकुमार कुंजर, प्रशासकिय अधिकारी सखाराम मोरे, मुख्य हिशोबनिस रामेश्वर म्हस्के, परचेस ऑफिस किरण सरोदे, स्थापत्य अभियंता अरुण गोडसे, अभियंता प्रमोद काळे, मधुकर भापकर, विनोद मोरे, तेजेस भुक्षणार, राहुल पानकडे, चांगदेव हाडुळे, विठठल टेके, संतोष कुदे नारायण शेळके, बाळु मोरे, शिवाजी दंवडे, ज्ञानेश्वर काळुके, सर्व कामगार व मोठया संख्याने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे शेवटी राहुल ढोले शेतकरी कृती समीती अध्यक्ष यांनी सर्वाचे अभार मानले.

# बसस्थानक परिसरात जुगार अड्ड्यावर लेडी सिंघमची कारवाई

## शहरात दुसरी कारवाई ! शहर पोलिसांचा मात्र कानाडोळा

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०४ नोव्हेंबर - शहरातील बसस्थानक परिसरात राजरोसपणे कल्याण मटका सुरू होता,गुप्त बातमीदारामार्फत ही माहिती सहाय्यक पोलिस अधिक्षक अपराजिता अग्निहोत्री यांना मिळताच त्यांनी धाड टाकत नऊ आरोपींना ताब्यात घेतले आहे

दि.०४ रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास शहरातील बस स्थानक येथे खुलेआम सुरू असलेल्या कल्याण मटका जुगार अड्ड्यावर सहाय्यक पोलिस अधिक्षक अपराजिता अग्निहोत्री यांनी आपल्या पथकासह धाड टाकत ६८,६३० रुपयांचा मुद्देमाला साहित तब्बल नऊ आरोपींना ताब्यात घेतले



आहे,विशेष म्हणजे अग्निहोत्री यांच्या पथकाने शहरात दुसरी कारवाई केल्याने नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत,शनिवार रोजी शहरातील सिद्दीक चौकातील भाजी मंडई परिसरात सुद्धा या पथळाने कारवाई केली होती,शहरात एवढ्या राजरोसपणे अवैध धंदे सुरू असून याकडे मात्र शहर पोलिसांचा कानाडोळा असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे,

शहरात वाढत्या चोऱ्या,अवैध धंदे,नशेखोरी, बघता या कारवाईने मात्र आता नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे,सहाय्यक पोलिस अधिक्षक अपराजिता अग्निहोत्री यांना शहरातील नागरिक लेडी सिंघम म्हणून संबोधू लागले आहे,या कारवाईत पोलिस हेडकॉन्स्टेबल कैलास निभोरकर,निळकंठ देवरे, पोलिस शिपाई मयूर वाळुंजकर,यांचा समावेश होता, पोलिस हेडकॉन्स्टेबल कैलास निभोरकर यांच्या फिर्यादीवरून कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# श्री क्षेत्र कचनेर येथे वार्षिक यात्रा महामहोत्सवाची धर्मध्वजारोहणाने भव्य सुरुवात

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, कचनेर (ता.जि. औरंगाबाद) येथे वार्षिक यात्रा महामहोत्सवाची सुरुवात धर्मध्वजारोहणाने अत्यंत भक्तीभावाने व उत्साहात झाली.

या सोहळ्याला आचार्य प्रणमसागर महाराज व वीरजनसागर महाराज यांची पावन उपस्थिती लाभली. यंदाच्या महामहोत्सवाचे महाप्रसाददाता म्हणून आदिनाथ स्टील ग्रुपतर्फे सौ. शिलादेवी झुंबरलालजी, सौ. निधी अल्केशकुमारजी, सौ. टीना शैलेशकुमारजी रावका, डॉ. मोतीलालजी, झुंबरलालजी, हिरालालजी, शांतीलालजी रावका (देशमुखनगर - पांढरीवाला) यांचा गौरव करण्यात आला.

धर्मध्वजारोहण अध्यक्ष सुरेशकुमार कासलीवाल, मॅनेजिंग ट्रस्टी भरतकुमार ठोळे, महामंत्री निलेशकुमार काला तसेच ट्रस्टचे पदाधिकारी यांच्या हस्ते पार पडले. यानंतर भगवंतांचा पंचामृत अभिषेक व शांतिमंत्र पठणाचा सोहळा पार पडला. महोत्सवानिमित्त




छत्रपती संभाजीनगर, मुंबई, पुणे, नागपूर, हैद्राबाद, इंदौर, कोल्हापूर, सांगली, जालना, आडुळ, पाचोड, सिल्लोड, कन्नड, गेवराई आदी ठिकाणांहून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली. तसेच परभणी, हिंगोली, केसापुरी, आष्टी, वडोदबाजार, श्रीरामपूर, जालना, जितूर, मानवत आदी ठिकाणांहून अनेक पायी यात्रेकरूंच्या दिंड्याही क्षेत्रावर दाखल झाल्या आहेत. भाविकांच्या सोयीसाठी सिडको व सेंट्रल बसस्थानकावरून कचनेर यात्रेसाठी ३५ बसची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती संयोजक अशोक गंगवाल यांनी दिली. यात्रा आयोजनात अध्यक्ष सुरेशकुमार कासलीवाल, मॅनेजिंग ट्रस्टी भरतकुमार ठोळे, उपाध्यक्ष संजयकुमार कासलीवाल, महामंत्री निलेशकुमार काला, तसेच कार्यकारिणी मंडळ व विश्वस्त मंडळातील सर्व पदाधिकारी, संयोजक व स्वयंसेवक यांनी अथक प्रयत्न केले आहेत.

पायी यात्रेकरूंसाठी आडुळ जैन समाज, पार्श्वनाथ ग्रुप, चंद्रप्रभु ग्रुप, रवि मसाले ग्रुप, देशमुखनगर मल्लीनाथ जैन मंदिर ग्रुप आदी संस्थांमार्फत निवास, जलपान व अल्पोहाराची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व उपक्रमांबाबतची माहिती प्रचारप्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

# फर्दापूर येथील हॉटेल कामगार महिला हिने परत रुम मध्ये सापडलेले पंधरा हजार केले परत



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ४ छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर हॉटेलमध्ये आर्य दिप मध्ये थांबलेले यांचे कागदपत्रे व पंधरा हजार केले परत हॉटेलमध्ये आर्य दिप मध्ये थांबलेले गुजरात अहमदाबाद हमीद भाई या हॉटेलमध्ये दोन दिवस मुलांच्या लग्नासाठी थांबलेले होते परंतु त्यांनी मंगळवारी रुम सोडल्यावर त्या रुम मध्ये हॉटेल मधील कामगार महिला साफसफाई साठी गेली असता त्या रुम मध्ये हमीद भाई यांचे महत्त्वाचे कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड व रोख १५००० रुपये यांना सापडले परंतु या महिला यांनी तात्काळ हॉटेल मालक दिपक जैस्वाल यांच्या ताब्यात दिले असता हॉटेल मालक यांनी ताबडतोब फोन करून त्यांना कळविले असता हमीद भाई परत आले आणि त्यांनी सर्वांचे आभार मानले आणि कामगार महिला निर्मलाबाई हिला परत पुन्हा बक्षीस म्हणून दिली यामुळे प्रामाणिकपणा अजुन हि आहे तसेच हॉटेल मालक याचे ते आभार मानून ते परत गुजरात निघून गेले

# 'स्मार्ट सुनबाई'चा ट्रेलर बगलामुखी देवी मंदिरात लाँच, प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला

छत्रपती संभाजीनगर - मराठी चित्रपटसृष्टीत नवा उत्साह आणणाऱ्या 'स्मार्ट सुनबाई' या बहुप्रतीक्षित चित्रपटाचा ट्रेलर नुकताच बगलामुखी देवी मंदिर, नलखेडा (मध्य प्रदेश) येथे सर्व कलाकारांच्या उपस्थितीत प्रदर्शित झाला. कौटुंबिक नातेसंबंध, रहस्य आणि विनोद यांच्या रंगांनी सजलेला हा ट्रेलर प्रेक्षकांच्या उत्सुकतेत भर घालणारा ठरला आहे.

शिवाजी दोलताडे दिग्दर्शित व गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित आणि कार्तिक दोलताडे पाटील सहनिर्मित हा सिनेमा एक संपूर्ण कौटुंबिक मनोरंजन म्हणून प्रेक्षकांसमोर येत आहे. चित्रपटातील गीत-संगीत, संवाद आणि आकर्षक दृश्यरचना यामुळे 'स्मार्ट सुनबाई' हा सिनेमा भावनिक आणि मनोरंजक दोन्ही अनुभव देणार आहे.

संतोष जुवेकर, किशोरी शहाणे, भाऊ कदम, सायली देवधर, मोहन जोशी आदी अनेक नामांकित कलाकारांनी अभिनयाची जादू निर्माण केली आहे. गीतकार वैभव देशमुख व अदिती द्रविड यांच्या लेखणीतून आणि गायक अजय गोगावले, वैशाली माढे यांच्या आवाजातून साकारलेली गाणी चित्रपटाला संगीताची झळाळी देतात.

# जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या गाथेची कथा 'अभंग तुकाराम'

छत्रपती संभाजीनगर - महाराष्ट्राला संत-महात्म्यांची उज्ज्वल परंपरा आहे. माऊलींच्या ज्ञानेश्वरीने महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचा पाया रचला आणि जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या अभंगांनी त्याच्यावर कळस चढवला. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. संत तुकाराम महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने ते स्थिरावले आहेत. जीवनप्रवाहात कायम राहून त्यांनी घेतलेला परमेश्वरप्राप्तीचा ध्यास आणि यातून घडलेला त्यांचा आध्यात्मिक प्रवास चकित करणारा आहे. लौकिकाडून अलौकिकाकडे नेणारा संत तुकाराम यांचा हा जीवनप्रवास 'अभंग तुकाराम' या चित्रपटातून दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी मांडला आहे. पॅनोरमा स्टुडिओज, चित्रकथी क्रिएशन्स निर्मित 'अभंग तुकाराम' ७ नोव्हेंबरला आपल्या भेटीला येणार आहे. पॅनोरमा स्टुडिओज ही निर्मिती संस्था या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. पॅनोरमा स्टुडिओचे कुमार मंगत पाठक चित्रपटाचे निर्माते आहेत. त्यासोबत अभिषेक पाठक, अजय अशोक पूरकर, दिग्पाल लांजेकर यांनीही निर्मितीची धुरा सांभाळली असून सहनिर्माते मुरलीधर छतवानी, रवींद्र औटी आहेत. दिव्य अनुभवाची प्रचिती देणाऱ्या या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित आहे. प्रेमरूप भक्तितत्त्वातून वास्तवाचे दर्शन घडविताना लोकजीवनातील भक्तीची गंगा अखंड वाहती ठेवून उभ्या केलेल्या जीवनवादी विवेकदर्शनाची झलक या ट्रेलरमधून दिसुन येते आहे.प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या भूमिकेत आहेत तर त्यांच्या पत्नीच्या आवलीच्या भूमिकेत अभिनेत्री स्मिता शेवाळे दिसणार आहे. त्यासोबत मृणाल कुलकर्णी, समीर धर्माधिकारी, अजय पुरकर, विराजस कुलकर्णी, अभिजित श्वेतचन्द्र, अजिंक्य राऊत, निखिल राऊत, बिपीन सुर्वे, सचिन भिलारे, अवधूत गांधी, नुपूर दैठणकर,तेजस बर्वे, ईश्मिता जोशी, रुद्र कोळेकर, अभीर गोरे या कलाकारांच्या चित्रपटात भूमिका आहेत.

## जाहीर प्रगटन

सर्वत्र जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री रमेश लक्ष्मण नवगिरे व त्याचे भाऊ रा. कंकराळा ता. सोयगांव. जि. छ. संभाजीनगर, ह.मु. उल्हासनगर यांची मौजे कंकराळा येथे जमीन गट नं ८८ क्षेत्र फळ ३ हे ७ आर ही वडिलोपार्जीत जमीन असुन त्यानी जमीन गट नं ८८ मौजे कंकराळा च्या बाबत मा० दिवाणी न्यायलय सोयगांव यांच्या न्यायालयात दिवाणी दावा क्रं १४/२०१६ हा दावा गौतम हिरामन जगताप व ईतर यांचे विरुध्द वाटनी होवुन मिळणे साठी दाखल केलेला आहे, व तो दावा माननीय दिवाणी न्यायालय सोयगांव येथे प्रलंबित आहे असे असतांना प्रतिवादी गौतम हिरामन जगताप हे जमिन गट नं ८८ मौजे कंकराळा विक्री करू पहात आहे तरि सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरील गट नं ८८ मौजे कंकराळा बाबत कुणीही गौतम हिरामन जगताप याच्याशी खरेदी विक्री चा व्यव्हार करु नये, केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल करिता जाहीर प्रकटन दिले असे.

दिनांक ४/११/२५

**मार्फत**
**ॲड. राजेश अ. गिरी**
**सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर**

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- २१६/२०२५.

अर्जदारः- १) सरूबाई तुकाराम बलांडे, वयः ८० वर्षे, धंदाः शेती.२) युवराज तुकाराम बलांडे, वयः ५५ वर्षे, धंदाः- शेती. दोन्ही रा. फर्दापुर ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

// विरूध्द //

गैरअर्जदारः-निरंक.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे तुकाराम यादव बलांडे हे दिनांक: २४/१२/२०११ ला मौजे फर्दापुर ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक:- ०२/१२/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :- ०४/११/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

# श्री क्षेत्र कपिलधार येथे शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या पायी दिंडीचे आगमन ; भक्तीचा महासागर ओसंडून वाहिला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ नोव्हेंबर**

त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री ष.ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या चोवीसव्या पायी दिंडीचे तमलूर-मदनापुर येथून श्री क्षेत्र कपिलधार येथे आज भव्य आगमन झाले. या आगमनाने कपिलधार नगरी भक्तीमय झाली असून सर्वत्र मन्मथ स्वामी की जय!, गुरुदेव की जय! या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.





श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या दिंडीचे कपिलधार येथे आगमन होताच भाविकांनी पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले.

मन्मथ मुक्तीधाम मठ ते श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी समाधी स्थळापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

या शोभायात्रेत सवाद्य मिरवणूक, फुलांच्या पाकळ्यांची उधळण, अतिशबाजी, आणि गुरूविषयी अपार आदरभाव दिसून आला.

मार्गात भक्तांनी महाराजांच्या पायावर फुलांची पखरण करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

दिंडीमध्ये भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

दूरदूरच्या गावांमधून हजारो भाविकांनी या दिंडीत सहभागी होण्यासाठी उपस्थिती दर्शवली.

मिरवणुकीत स्त्री-पुरुष, युवा व वृद्धांनी भक्तिगीतांच्या तालावर नृत्य करत वातावरण मंगलमय केले.

दिंडीमध्ये चालणारे जय मन्मथ स्वामी, हर हर शिवाचार्य अशा घोषांनी वातावरण अधिकच पवित्र झाले.

पाद्यपूजा व पुष्पवृष्टी

श्री मन्मथ स्वामी समाधी स्थळी पोहोचल्यावर श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांची पाद्यपूजा करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

गुरुवर्यांनी समाधीस्थळावर मस्तक टेकवून मन्मथ स्वामींना वंदन केले व सर्व भक्तांसाठी आशीर्वाद दिला.

या प्रसंगी महाराजांनी भक्तांशी संवाद साधत गुरूभक्ती, साधना आणि समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

अभूतपूर्व स्वागताने महाराज भावुक

गुरुवर्यांच्या स्वागतासाठी कपिलधार ग्रामस्थ, मठातील सेवक व स्थानिक भक्तांनी विशेष तयारी केली होती.संपूर्ण कपिलधार नगरी फुलांनी, पताकांनी व शुभ्र रांगोळीने सजवण्यात आली होती.

या अभूतपूर्व स्वागताने शिवाचार्य महाराज भावुक झाले. त्यांनी समाधान व्यक्त करत सांगितले,भक्ती आणि प्रेम हेच आमचे खरे वैभव आहे. मन्मथ स्वामींच्या कृपेने हे पवित्र स्थळ अधिक तेजोमय होईल.

समारोप व आशीर्वचन

कार्यक्रमाच्या शेवटी महाराजांनी सर्व उपस्थितांना आशीर्वचन दिले आणि समाजात धर्म, सदाचार आणि एकतेचा संदेश देत प्रसंगी उपस्थित राहिलेल्या भाविकांचे आभार मानले.यावेळी मठ परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



हिंदु संस्कृतीमध्ये तुळशीच्या विवाहानंतरच स्त्री पुरूषाच्या विवाहाला धर्मशास्त्रामध्ये मान्यता आहे. त्यानुसार तुळशी विवाह पार पडत आहे. उद्या पौर्णिमा असल्याने शेवटचा मुहूर्त आहे तुळशी विवाहाचा त्यामुळे मंगळवारी रोजी मोठ्या प्रमाणात तुळशी विवाह पार पडले.

## कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त श्री दत्त संस्थान, बालाघाट येथे भव्य उत्सव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ नोव्हेंबर**



त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री. ष.ब्र.१०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांच्या कृपाशिर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री दत्त संस्थान, बालाघाट (कपिलधारवाडी-मांजरसुंबा) येथे बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त भव्य उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा उत्सव भक्तीभावाने आणि मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, सकाळी पहाटे महापूजा, अभिषेक, आरती व नामस्मरण कार्यक्रमाने सोहळ्याची सुरुवात होईल.

दुपारी सर्व उपस्थित भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील सर्व श्रद्धाळू भक्तांना या पवित्र कार्तिक शुद्ध पौर्णिमा उत्सवाला उपस्थित राहून श्री दत्त महाराजांच्या कृपाशिर्वादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अन्नदाते म्हणून विक्रम माणिक वाघिरे, बंकट श्रीहरी वाघिरे आणि धर्मा दिनानाथ जगताप उदंडवडगाव (शिवाजीनगर) यांचे विशेष योगदान आहे.उत्सवाच्या तयारीसाठी स्थानिक ग्रामस्थ आणि श्रद्धाळू भक्त वर्ग उत्साहाने कार्यरत असून, परिसर भक्तिरसाने ओतप्रोत भरून गेला आहे.

## बीड नाळवंडी रस्त्याच्या प्रश्नासाठी बैलगाडी, अर्ध नग्न, थाळी नाद मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ नोव्हेंबर**



बीड तालुक्यातील नाळवंडी गावाला बीड शहराकडून जोडला जाणारा रस्ता गेली २० वर्ष विकासाभावी कितपत पडलेला आहे. याच ठिकाणच्या ग्रामस्थांनी या रस्त्याच्या प्रश्नासंदर्भात अनेक वेळा उपोषणे, निदर्शने केलेली आहेत परंतु सदरील प्रश्न अद्याप देखील मार्गी न निघाल्यामुळे यावेळी मात्र या परिसरातील ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत काल जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बैलगाडी, अर्ध नग्न, थाळी नाद या मोर्चाच्या आयोजन केले होते. त्याचबरोबर सदरील रस्ता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांना अगोदर होणार नसेल तर आम्ही या परिसरालगत असलेले सर्व ग्रामस्थ मतदानावरती बहिष्कार टाकणार या मुद्द्यावरती ते ठाम असताना पाहायला मिळाले होते. तसेच या आंदोलनावेळी एका आंदोलनकर्त्याने सदरील रस्त्यावरील गाळाच्या पाण्याने स्वतः आंघोळ करत प्रशासनाचा व लोकप्रतिनिधीचा जाहीर निषेध व्यक्त केलेला पाहायला मिळाला

## नियोजन समितीची कामांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ नोव्हेंबर**

जिल्हा नियोजन सभागृहात आज जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत विविध विकास कामांचा आढावा घेण्यात आला तसेच नव्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जितिन रहेमान, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी जिल्हाधिकारी श्री. जान्सन यांनी मागील बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणीची स्थिती तपासली आणि आलेला निधी वेळेत खर्च करावा व प्रलंबित निधीचे प्रस्ताव वेळेत मंजूर करुन घ्यावेत, विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच निधीचा योग्य वापर करून जनतेला त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा यावर त्यांनी भर दिला.संबधित अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागांतील प्रगतीचा अहवाल सादर केला. जिल्हाधिकारी यांनीबैठकीच्या समारोप प्रसंगी सर्वांना सहकार्याने काम करण्याचे आवाहन केले.

## जनविकास सेवाभावी संस्थेचे सचिव रमेश भिसे यांच्या मातोश्री जिजाबाई विनायकराव भिसे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ नोव्हेंबर**

केज तालुक्यातील सुर्डी येथील कै. सगजानबाई विनायकराव भिसे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अंबाजोगाई येथे उपचारा दरम्यान निधन झाले.

शांत, मनमिळाऊ, मितभाषी स्वभावाच्या सगजानबाई विनायकराव भिसे गेल्यामुळे सुर्डी परिसरात व जनविकास परिवाराला मानणाऱ्या वर्गात मोठी शोककळा पसरली आहे.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या जनविकास सेवाभावी संस्थेचे सचिव श्री रमेश विनायकराव भिसे यांच्या मातोश्री होत दि.०५ नोहेंबर २०२५ बुधवार रोजी सकाळी नऊ वाजता सुर्डी येथे त्यांच्या वर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्रराज्य युवक प्रदेशाध्यक्ष पदी रोहन गलांडे पाटील यांची नियुक्ती!

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ नोव्हेंबर**

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील रोहन गलांडे पाटील यांची अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्रराज्य युवक प्रदेशाध्यक्ष पदी, सचिव चंद्रकांत दादा जाधव व कार्याध्यक्ष सतिष पवार पाटील यांच्या शिफारशीनुसार अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ संस्थापक अध्यक्ष शिवश्री प्रल्हाद दादा गुळभिले पाटील यांच्या आदेशानुसार नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली आहे तरी रोहन गलांडे पाटील यांनी कुणबी मराठा महासंघाच्या संस्थापक अध्यक्ष शिवश्री प्रल्हाद दादा गुळभिले यांचे व सर्व वरीष्ठ पदाधिकारी यांचे आभार मानले आहेत,आयुष्यभर ऋणी राहीन असे मत व्यक्त केले आहे.तसेच रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले की संघाने माझी नियुक्ती आजपर्यंत केलेल्या कामाची दखल घेऊन केलेली आहे जसे की मराठा आरक्षणासाठी अमरण उपोषण तसेच सर्वसामान्य जनतेसाठी अनेक छोटे मोठे आंदोलने विकास कामे केले आहेत त्यांची दखल घेऊन




मला अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे त्यामुळे मी यापुढेही असेच सर्वसामान्य जनतेसाठी सर्व जातिधर्मातील नागरिकांनसाठी कायम लढत राहील शेवटच्या श्वासापर्यंत व महाराष्ट्रात अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे संघटीकरण मोठ्या संख्येने करणार आहे असे वचन संस्थापक अध्यक्ष यांना दिले आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

## केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत ७ नोव्हेंबर रोजी भव्य शेतकरी संवाद मेळावा!

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ नोव्हेंबर**

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीचा रविवार, दिनांक ०२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आढावा घेतला. कृषीकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस विविध शासकीय कार्यालयांचे कार्यालयीन प्रमुख उपस्थित होते. शेतकरी संवाद मेळाव्यास मराठवाड्यातील हजारो शेतकरी उपस्थित राहणार आहेत. याच ठिकाणी कृषी प्रदर्शिनी भरवण्यात येणार आहे. युद्ध पातळीवर मंडप उभारणी, हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी हेलिपॅड तयार करण्यात येत असून, सुरू असलेल्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. सर्व प्रशासकीय विभागांना त्यांनी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. या आढावा बैठकीस ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांच्यासह सर्व प्रमुख संयोजकांची उपस्थिती होती.

ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांची प्रेरणा आणि संकल्पनेतून दिनांक ०७ नोव्हेंबर रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा संपन्न होत आहे. या कार्यक्रमास देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजाताई मुंडे, खा.बजरंग सोनवणे, खा.रजनीताई पाटील, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अनेक मान्यवर



कृषीकुल येथे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली प्रशासकीय आढावा बैठक

उपस्थित असतील. सदरील कार्यक्रमास राज्यातील ३५ ते ४० हजार शेतकरी उपस्थित राहणार आहेत. मागील अनेक दिवसांपासून कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू आहे. आलेल्या शेतकऱ्यांना बसण्यासाठी वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात येत आहे तर येणाऱ्या मान्यवरांचे हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी कार्यक्रमस्थळीच हेलिपॅडची व्यवस्था करण्यात येत आहे. कृषीकुल प्रशिक्षण केंद्र सिरसाळा येथे जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या प्रशासकीय आढावा बैठकीस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, नगर पालिका, तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती आरोग्य विभाग आदींसह अनेक शासकीय विभागांचे कार्यालयीन प्रमुखांची उपस्थिती होती.

अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा

मराठवाडा हा सर्वाधिक दुष्काळी प्रदेश म्हणून गणल्या जातो. कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळा सतत पडल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कमालीची ढासळली आहे. आर्थिक संकटात आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्येचे मार्ग पत्करले. ही परिस्थिती कुठेतरी बदलली पाहिजे, त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे, त्यांच्यातील हरवलेला आत्मविश्वास पुन्हा नव्याने जागवला पाहिजे हा या शेतकरी संवाद मेळाव्याचा प्रमुख उद्देश असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना ग्लोबल विकास ट्रस्टकडून तयार करण्यात आल्या असून त्यांचीही घोषणा याच कार्यक्रमात होणार आहे. त्यामुळे हा अभूतपूर्व व भुतो न भविष्यती असा शेतकरी संवाद मेळावा होणार आहे. या मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# बारावी नापास ते राज्यसेवा परीक्षेतील गट (अ) पदाला गवसनी

## कुणबी प्रमाण पत्रामुळेच राज्यसेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याची श्रीकांत होरमाळे यांची भावना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ नोव्हेंबर**

दिवसेंदिवस शिक्षण हे सर्वसामान्यांसाठी महागडे आणि न परवडणारे त्याचबरोबर अतिशय स्पर्धेचे क्षेत्र होत चाललेले असतानाच समाजामध्ये काही तरुण असे असतात की,जे जिद्द,चिकाटी व कठीण परिश्रमाच्या बळावर आपले स्वप्न सत्यात उतरवतात.अशाच प्रकारची एक घटना/प्रसंग नुकताच राज्यसेवा परीक्षचा निकाल लागल्यानंतर पाहायला मिळाली.धारूर तालुक्यातील संगम या गावातील श्रीकांत होरमाळे या तरूणाने राज्यसेवा परिक्षेत १४० वा रँक मिळवत स्वतःचे स्वप्न सत्यात उतरले. श्रीकांत होरमाळे यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले. त्यानंतर दिंद्रुड येथून ६वी ते १२वी पर्यंतचे शिक्षण श्रीकांत यांनी मराठी माध्यमातून पूर्ण केले. दहावी बोर्ड परिक्षेत ७३% गुण मिळाल्यामुळे पुढील ११वी व १२ वीचे शिक्षण विज्ञान शाखेतून पूर्ण करण्याचे होरमाळे यांनी ठरवले परंतु,१२वी वर्गात शिकत असताना गणित विषय कच्चा असल्याने श्रीकांत यांना अपयश आले. तद्नंतर श्रीकांत यांनी १२ वीच्या दोन पुरवणी परीक्षा देत बारावी उत्तीर्ण केली. बारावीमध्ये असताना आलेल्या अपयशाला खचून न जाता पुढे स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय श्रीकांत यांनी घेतला व त्यासाठी मुक्त विद्यापीठात प्रवेश घेत स्पर्धा परिक्षेची तयारी देखिल सुरू केली. २०१५ साली श्रीकांत होरमाळे यांची पदवी पूर्ण झाली आणि तेव्हांपासून त्यांनी पुर्णवेळ युपीएससी च्या परिक्षेची तयारी करण्यासाठी वेळ देण्याचे ठरवले. २०१५ - २०२१ या कालावधीमध्ये श्रीकांत यांनी चांगल्या पद्धतीने युपीएससीची तयारी केली परंतु त्यांना यशाने थोडच्या प्रमाणात हुलकावणी दिली. पुढे २०२१ पासून श्रीकांत हे युपीएससी बरोबरच राज्यसेवा परीक्षा देखिल देत होते परंतु,यश काही त्यांना मिळत नव्हते. अशाही परिस्थितीत नकारात्मक न होता त्यांनी स्पर्धात्मक परिक्षांची तयारी सुरूच ठेवली. योगायोगाने २०२३ - २०२४ ला श्रीकांत यांचे कुणबी प्रमाणपत्र निघाले आणि राज्यसेवा परिक्षेत त्यांनी ओ बी सी प्रवर्गातून घवघवीत यश संपादन करून गट अ ची पोस्ट मिळवली. जर कुणबीप्रमाणपत्र मिळाले नसते तर मला गट ब च्या पदावर समाधान मानाने लागले असते अशी भावना श्रीकांत होरमाळे यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केली. राज्यसेवा स्पर्धा परिक्षेत यश संपादन केल्याबद्दल श्रीकांत यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# भारतीय महिला क्रिकेटचा दबदबा

पंचमीपर्यंत दिवाळीचा सण आटोपला. आत्ता कुठे फटाक्यांची धडाडधूम बंद झाली होती. पण, अचानक रविवारी रात्री बारा वाजताच्या सुमारास भारतभरातील आकाशात आतषबाजी सुरू झाली आणि पुन्हा दिवाळीचा दिवस परतला की काय, असा माहौल तयार झाला. अर्थात, याचे कारणही दिवाळीच्या सणाइतकेच मोठे होते. ५२ वर्षांच्या दीर्घ काळानंतर भारताच्या महिला क्रिकेटपटूंनी दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघाला नमवून आणि संपूर्ण जगाच्या नाकावर टिच्चून जगज्जेतेपद पटकावले. भारतातील लोकांसाठी क्रिकेट हा कायमच आवडीचा विषय राहिला आहे. त्यातच वर्ल्ड कप म्हटले की विचारूच नका! त्यावेळी भारतीयांचा उत्साह शिगेला पोहोचतो. यावेळी महिला क्रिकेटपटूंनी देदीप्यमान कामगिरी करत जगाच्या पाठीवर आपल्या कर्तृत्वाची आणि पर्यायाने तिरंग्याची मोहर उमटवली आहे. महिलांच्या सन्मानासाठी ओळखल्या जाणाऱ्या भारताला आता महिलांनी मोठा सन्मान मिळवून दिला हा आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे.

हा चमत्कार काही एका रात्रीत घडलेला नाही. तब्बल दोन दशकांपासून भारतीय महिला क्रिकेटपटूंचा संघर्ष, जिद्द, चिकाटी, सातत्य आणि परिश्रम घेण्याच्या वृत्तीचे हे फलित आहे. १९७३ साली महिला विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली. परंतु भारतीय महिला संघाला ५२ वर्षांत कधीही विश्वविजेतेपद जिंकता आलेले नव्हते. दोनदा भारताच्या हातातून विश्वचषक निसटला. २००५ आणि २०१७ मध्ये उपविजेतेपदावर त्यांना समाधान मानावे लागले. आता त्यांनी तिसऱ्यांदा २०२५ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली. यंदाच्या महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताचा ऐतिहासिक विजय हा केवळ सध्याच्या संघाचा विजय नव्हे. तो भारतीय महिला क्रिकेटमधील काही दिग्गजांचे कित्येक दशकांचे समर्पण, चिकाटी आणि प्रगतीचा कळसाध्याय आहे. सुरुवातीच्या प्रणेत्यांपासून ते आधुनिक आयकॉनपर्यंत, आपल्या क्रिकेटपटूंनी जागतिक स्तरावर भारताच्या उदयाचा मार्ग मोकळा केला. आपण जग जिंकू शकतो, असा विश्वास त्यांनी आपल्या खेळाडूंना दिला. भारतीय महिला क्रिकेटमध्ये ५० वर्षांहून अधिक काळ खेळाडू आणि प्रशासक म्हणून काम करणाऱ्या डायना एडुलजी यांनीही खेळाडूंना सतत प्रोत्साहन दिले. खेळाडूंनीही जिद्द कायम ठेवली. भारतीय महिलांचा यंदाच्या विश्वचषकापर्यंत पोहोचण्याचा मार्ग तेवढा सोपा नव्हता. साखळी फेरीत इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या तीन संघांकडून पराभूत झाल्यानंतरही मुलींनी जिद्द सोडली नाही. याच दरम्यान सलामी फलंदाज प्रतीका रावल हिच्या घोट्याला दुखापत झाली, त्यामुळे ती विश्वचषकाच्या बाहेर झाली. तिच्या जागी शेफाली वर्माला विश्वचषकाच्या संघात स्थान दिले गेले. आधी जाहीर झालेल्या संघात तिला स्थान नव्हते, परंतु प्रतीकाच्या जागी तिला प्रवेश देण्याबाबतची विनंती बीसीसीआयने आयसीसीकडे केली. ती मान्य झाल्यामुळे भारतीय संघाला बळ मिळाले. उपांत्य सामन्यात भारतीय महिलांसमोर गत-विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाचे आव्हान होते, परंतु हरमनप्रीत कौर आणि तिची चमू डगमगली नाही. कांगारूंनी ३३८ धावांचा डोंगर उभा करूनही भारतीय मुली वाघिणीसारख्या तुटून पडल्या आणि विश्वविक्रमी लक्ष्य गाठत दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला.

नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर अर्थात आपल्या घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध जेमिमाह रॉड्रिग्जने कमालीची फलंदाजी केली आणि नाबाद १२७ धावांची शतकी खेळी करीत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटूंनीही भारतीय महिला संघाच्या जिद्द, चिकाटी आणि लढाऊवृत्तीचे कौतुक केले. विश्वविजेत्याला हरविल्यामुळे भारतीय महिला संघाचे मनोबल उंचावले. त्याचा फायदा त्यांना रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात झाला. डी. वाय. पाटील मैदान प्रेक्षकांनी खचाखच भरले होते. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. भारताच्या स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, कर्णधार हरमनप्रीत कौर, दीप्ती शर्मा, अमनजोत कौर व ऋचा घोषने कमालीचा खेळ दाखविला. त्यातही शेफाली व दीप्तीचा अष्टपैलू खेळ डोळ्याचे पारणे फेडणारा आणि भारताच्या विश्वचषकाचे स्वप्न पूर्ण करणारा ठरला. फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये या दोघींनी कमालीची कामगिरी केली. त्याचे बक्षीसही त्यांना मिळाले. शेफाली सामनावीर ठरली, तर दीप्ती मालिकावीर पुरस्काराची मानकरी ठरली. धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्व्हार्टने शतक झळकावले, तेव्हा एका क्षणी भारताच्या हातातून विश्वचषक निसटतो की काय, असे वाटत असताना दीप्ती शर्माने लॉरा वोल्व्हार्ट, ॲनेरिक डेर्केसेन, क्लो ट्रायॉन व नादिन डी क्लर्कला तंबूचा रस्ता दाखवून सामन्याला कलाटणी दिली. शेफालीनेही दोन बळी घेत भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला. आधी शेफालीने आपल्या बॅटची चमक दाखवीत ७८ चेंडूंत ८७ धावा, तर दीप्तीने ५८ चेंडूंत ५८ धावा केल्या. भारताने दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय नोंदवीत ऐतिहासिक आयसीसी वन-डे विश्वचषकावर आपले नाव कोरले. तिसऱ्या प्रयत्नात वन-डे विश्वचषकाला गवसणी घालता आल्यामुळे भारतीय महिला क्रिकेटपटूंच्या आनंदाला तर पारावर उरला नव्हता. हरमनप्रीत, स्मृती, शेफाली, दीप्ती व शतकवीर लॉराचा महत्त्वपूर्ण झेल टिपणाऱ्या अमनजोतने वन-डे विश्वचषकच जिंकला नाही, तर भारतीय प्रेक्षकांची मने जिंकली.

भारताने ऐतिहासिक वन-डे विश्वचषक जिंकल्यामुळे आता महिला क्रिकेटचे अच्छे दिन आले आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. देशच नव्हे, तर जगभरातील क्रिकेट दिग्गजांनी भारतीय महिला संघाचे कौतुक व अभिनंदन केले. या विजयामुळे आता अधिकाधिक मुलींना क्रिकेट खेळण्यास प्रेरणा मिळेल तसेच महिला क्रिकेटमध्ये मोठी गुंतवणूक आणि संधी निर्माण होतील. डी. वाय. पाटील स्टेडियमवरील प्रेक्षकांची गर्दी लक्षात घेता पुढील महिला प्रीमियर लीग क्रिकेट बघण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी निश्चित वाढेल. तसेही भारतीय क्रिकेट नियामक मंडळ महिला क्रिकेटच्या वाढीसाठी, प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असतेच. पुरुष क्रिकेटपटूंप्रमाणे महिला क्रिकेटपटूंनाही सराव-प्रशिक्षणासाठी तसेच विदेश दौऱ्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. एवढेच नव्हे, तर आयसीसीने स्पर्धेत विजेत्या महिला संघालाही पुरुष संघाएवढाच रोख पुरस्कार देण्याचे धोरण अवलंबिले आहे. हा महिलांचा सन्मान आहे. विश्वविजेत्या भारतीय महिला संघाला ४० कोटी रुपयांचा, तर दक्षिण आफ्रिकेला २० कोटी रुपयांचा रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय बीसीसीआयने भारतीय महिला संघाला ५१ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे.

महिला क्रिकेटपटूंनी वन-डे व टी-२० क्रिकेट खेळण्यावरच नव्हे, तर कसोटी क्रिकेटवर सुद्धा आता भर देण्यात येत आहे. त्यानुसार द्विपक्षीय कसोटी मालिकांचे आयोजन करण्याचा बेत बीसीसीआयने आखला आहे. त्यामुळे आता भारतीय महिला क्रिकेटमध्ये अधिकाधिक महिलांना, विशेषतः प्रतिभावान खेळाडूंना संधी उपलब्ध होणार आहे. भविष्यात पुरुषांप्रमाणे महिला खेळाडूंचेही वन-डे, टी-२० आणि कसोटी असे वेगवेगळे संघ निर्माण होतील आणि त्यातून नवनवीन प्रतिभावान खेळाडूंना देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल, तेव्हा या खेळाची आवड असलेल्या युवतींनी क्रिकेटकडे वळण्यास काही हरकत नाही. दृढनिश्चय करून केवळ मेहनत घेण्याची तयारी असावी. सातत्याने प्रयत्न केल्यास यश निश्चितच मिळेल. क्रिकेट कौशल्य आत्मसात करतानाच शारीरिक क्षमता वाढीसाठी सुद्धा प्रयत्न केले पाहिजेत. या ऐतिहासिक विजयामुळे यापुढे भारतीय महिला क्रिकेट संघ जगात भारीच असणार आहे, असा विश्वास निर्माण झाला आहे. जगातील बारा देशांत एकदिवसीय महिला क्रिकेट हा खेळ खेळला जातो. आता कोणताही देश भारतीय महिला क्रिकेट संघाला कमी लेखणार नाही. भारतीय महिला क्रिकेटची ताकद इतर देशांना रविवारी दिसलीच आहे. भारतीय महिला क्रिकेटचा दबदबा जगभरात असाच कायम राहो, हीच शुभेच्छा.


## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# चीनशी करारामुळे जीव भांड्यात!

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग सहा वर्षांनी भेटले आणि दोन्ही महासत्तांमधील बैठक महत्त्वाची होती; संपूर्ण जगाने या बैठकीवर लक्ष ठेवले होते. हे नेते अलिकडेच दक्षिण कोरियातील बुसान विमानतळावर भेटले आणि त्यांची बैठक शंभर मिनिटे चालली. बैठकीपूर्वीच ट्रम्प यांना बैठक यशस्वी होईल, असा विश्वास होता. त्यामागे कारणही तसेच होते. अमेरिकेला चीनबरोबर वाटाघाटी करून 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या आयातीचा आणि सोयाबीनच्या निर्यातीचा प्रश्न सोडवणे जास्त महत्त्वाचे होते. अमेरिकेच्या शेतकऱ्यांचा तसेच तंत्र उद्योगाचा मोठा दबाव ट्रम्प यांच्यावर होता. दोन महासत्तांच्या प्रमुखांच्या भेटीनंतर अमेरिकेच्या अध्यक्षांनी मोठी घोषणा केली. त्यात म्हटले होते की, चीनमधून येणाऱ्या वस्तूंवरील एकूण सरासरी शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की अमेरिकेने चीनवर अनेक वेळा शुल्क लादले आहे. रागाच्या भरात ट्रम्प यांनी हे शुल्क जाहीर केले. ट्रम्प यांच्या मागील कार्यकाळात स्टीलवर १९ टक्के, एप्रिल २०२५ मध्ये दहा टक्के बेसलाईन शुल्क, फेंटानिलवर २० टक्के शुल्क आणि इतर शुल्क समाविष्ट होते. अशा प्रकारे अमेरिकेने चीनवर सरासरी ५५ टक्के शुल्क लादले होते. ऑगस्ट २०२५ मध्ये वाढून ते ५७ टक्के झाले. तथापि, दोन्ही नेत्यांमधील बैठकीनंतर, चीन आता सरासरी ४७ टक्के शुल्काच्या अधीन असेल. जिनपिंग यांच्याशी बोलल्यानंतर, ट्रम्प यांनी घोषणा केली, की चीनवर लादलेले फेंटानिलशी संबंधित शुल्क वीस टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जात आहे. परिणामी अमेरिकेचा जीव भांड्यात पडला असल्यास नवल नाही.

ट्रम्प यांच्या शुल्ककपातीच्या बदल्यात जिनपिंग आता अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्यास सहमत झाले आहेत. चर्चेबाबतच्या इतर तपशिलामध्ये टिकटॉक कराराबाबत चर्चेचा कोणताही उल्लेख नव्हता. दोन्ही नेत्यांनी सांगितले की ते युद्ध संपवण्यासाठी एकत्र काम करतील. दोन्ही बाजूंनी व्यापार आणि सहकार्यावर महत्त्वाचे करार केले. शी जिनपिंग फेंटानिल दरवाढ थांबवण्यासाठी कठोर परिश्रम करतील आणि अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर पुढील निष्कर्ष लवकरच घोषित केले जातील. 'रेअर अर्थ मॅग्नेट'वर दर वर्षी चर्चा केली जाईल. या करारानंतर इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक वाहने आणि संरक्षण उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या साहित्यांचा जागतिक प्रवेश स्थिर करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल पुढे पडले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी दुर्मिळ पृथ्वी खनिजांबाबत करार केला असल्याचे जगाला सांगत जणू सुटकेचा निःश्वास सोडला. ट्रम्प यांनी सांगितले, की चीनने पुढील वर्षासाठी अमेरिकेला 'रेअर अर्थ मॅग्नेट' पुरवण्यास सहमती दर्शवली आहे. ट्रम्प यांनी असेही जाहीर केले की फेंटानिल (एक



अंमली पदार्थ) साठी चीनवरील कर दहा टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासह, अमेरिकेचा चीनवरील एकूण करभार आता ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. 'जिनपिंग हे खूप कठोर वाटाघाटी करणारे आहेत, ही चांगली गोष्ट नाही,' असे ट्रम्प यांनी सांगितले. या भेटीच्या निमित्ताने अमेरिका आणि चीनमधील सर्व वाद मिटले, असे त्यांनी सांगितले.

याच सुमारास ट्रम्प आणि शी जिनपिंग यांनी रशिया-युक्रेन संघर्ष सोडवण्यासाठी सहकार्यावरही चर्चा केली. अमेरिकेच्या अध्यक्षांनी सांगितले की त्यांच्या संभाषणात तैवानचा मुद्दा आला नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की चीनने नेहमीच तैवानवर दावा केला आहे. अमेरिकेने मुख्य भूमी चीनपासून दूर असलेल्या या बेटाच्या स्वायत्ततेला पाठिंबा दिला आहे. म्हणूनच, चीनचे जिनपिंग ट्रम्प यांच्यासमोर तैवानचा मुद्दा उपस्थित करतील, अशी अपेक्षा होती. ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात सहा वर्षांनंतर भेट झाली. त्यांच्यात झालेली चर्चा आणि बैठकीचे एकूण निष्कर्ष पाहता जिनपिंग यांनी अमेरिका तसेच ट्रम्प यांना दाती तृण धरून शरण यायला लावले, असा अर्थ होतो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तसेच भारतावर ट्रम्प वारंवार टीका करत असताना भारताने कठोर उत्तर दिले नाही; परंतु चीनने ट्रम्प यांना सातत्याने कठोर उत्तर देऊन आपल्या अटींवर अमेरिकेला शरण यायला भाग पाडले. गेल्या सहा महिन्यांमध्ये हे दुसऱ्यांदा घडले आहे. अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'ला चीनने अमेरिकेचे नाक दाबून उत्तर दिले. 'रेअर अर्थ मॅग्नेट'च्या निर्यातीवर बंधने आणली. त्याचा परिणाम अमेरिकेवर झाला. 'रेअर अर्थ मॅग्नेट'बाबत जगात चीनची मक्तेदारी आहे. अन्य देश ही मक्तेदारी मोडीत काढण्याचा आता प्रयत्न करत असले, तरी ते एका दिवसात साध्य होणार नाही. ट्रम्प यांना त्याची जाणीव झाली असावी. चीन जगभरातील 'रेअर अर्थ मॅग्नेट'चे ७० टक्के उत्पादन नियंत्रित करते. चीनने त्याला जागतिक शक्ती संतुलनाचे शस्त्र बनवले आहे. यामुळेच ट्रम्प यांना तडजोड करण्यास भाग पडले.

अमेरिकेचे संरक्षण आणि ऊर्जा-केंद्रित तंत्रज्ञान उद्योग या खनिजांशिवाय काम करू शकत नाहीत. अमेरिकेच्या सुप्रसिद्ध एफ-३५ लढाऊ विमानात ४१८ किलो 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरले जाते. त्याचप्रमाणे, अमेरिकन नौदलाच्या आर्ले बर्क डीडीजी ५१ विनाशिकेत २,६०० किलो 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरले जाते. अमेरिकेच्या संरक्षणक्षेत्रातही हेच घडते. इतर उद्योगांनाही त्यांच्याशिवाय संघर्ष करावा लागतो. इलेक्ट्रिक वाहनांपासून स्मार्टफोनपर्यंत सर्व काही 'रेअर अर्थ मॅग्नेट'शिवाय अशक्य आहे. अमेरिकेची ही दुखरी नस चीनने दाबल्यामुळेच ट्रम्प चीनशी व्यापार करार करण्यासाठी पुढे आले. अमेरिकेच्या 'चिप युद्ध' आणि 'टॅरिफ वॉर'ला उत्तर म्हणून चीनने हे पाऊल उचलले. चीनने म्हटले होते, की त्यांच्या 'रेअर अर्थ मॅग्नेट' वापरणाऱ्या कोणत्याही कंपनी किंवा देशाला त्यांची परवानगी घ्यावी लागेल. या पृष्ठभूमीवर ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात सहा वर्षांनंतर बैठक झाली. दोन्ही देशांमधील व्यापार कराराच्या चौकटीअंतर्गत चीनने अमेरिकेला दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या निर्यातीवरची बंदी किमान एक वर्षासाठी पुढे ढकलण्याचे संकेत दिले आहेत. चिनी वस्तूंवर ट्रम्प यांनी लादलेले प्रस्तावित शंभर टक्के आयात शुल्क आता टळले आहे. ही घोषणा महत्त्वपूर्ण आहे. त्या बदल्यात चीन अमेरिकेकडून सोयाबीनची पुन्हा खरेदी सुरू करणार आहे आणि 'रेअर अर्थ मॅग्नेट'वरील निर्यात बंदी किमान एक वर्षासाठी पुढे ढकलण्यास तयार आहे. सरत्या काळामध्ये चीनने 'रेअर अर्थ मॅग्नेट'चे उत्पादन आणि शुद्धीकरण याबाबत जगभरात धाक निर्माण केला. उर्वरित जग अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'पुढे झुकले; परंतु चीन अविचल राहिला. यामुळे काही 'रेअर अर्थ मॅग्नेट' आणि कायमस्वरूपी चुंबक श्रेणीतील उत्पादनावरील निर्यात नियंत्रणे वाढली. संरक्षण, इलेक्ट्रिक वाहने, स्वच्छ सौर ऊर्जा उत्पादने आणि उच्च-तंत्रज्ञान उद्योगांवर याचा लगेचच परिणाम झाला. अमेरिकेने चीनच्या वर्चस्वापासून मुक्त होण्याचा प्रयत्न केला नाही किंवा करत नाही, असे नाही. ट्रम्प यांनी युक्रेनशी केलेल्या करारात आपल्यासाठी 'रेअर अर्थ मॅग्नेट'ना सुरक्षित करण्याकडे लक्ष केंद्रित केले होते. ट्रम्प हे या खनिजांचा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी आशिया दौरा करत आहेत. जपान, मलेशिया, व्हिएतनाम आणि कंबोडियासोबतचे त्यांचे करार या संदर्भातील महत्त्वपूर्ण उदाहरणे म्हणून पाहिले जाऊ शकतात. तथापि, या घटकांच्या अंमलबजावणीसाठी बराच वेळ आणि पैसा लागेल. ही परिस्थिती लक्षात घेऊन चीनने ट्रम्प यांना त्यांच्या व्यापार धोरणांबाबत माघार घेण्यास भाग पाडले. परिणामी, अमेरिकेकडे दुसरा पर्याय नाही, ती चीनला दुखावू शकत नाही हे नव्याने सिद्ध झाले. या घडामोडींमधून जागतिक व्यापार आणि राजकारण नवा धडा घेऊ शकणार आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# परतीच्या पावसाने पिकांचे नुकसान

परतीच्या पावसामुळे महाराष्ट्रात विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि कोकण भागात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विदर्भातील अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस पडल्याने शेती पिकांचे नुकसान झाले आहे. परतीच्या पावसामुळे हातातोंडाशी आलेली खरीप पिके- जसे सोयाबीन, कापूस, मका आणि भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. बुलढाणा, अकोला व वाशीम जिल्ह्यांत पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. यादरम्यान यवतमाळ जिल्ह्यातील ११ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. नागपूरसह चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा या पूर्व विदर्भातील जिल्ह्यातही परतीच्या पावसाने थैमान घातले. यात हजारो हेक्टरवरील पिकांचे अतोनात नुकसान झाले. खरीप हंगामात कर्जबाजारी होत शेतकऱ्यांनी नगदी पीक असलेल्या सोयाबीनची पेरणी केली. पावसाने साथ दिल्याने पीकही बहरले. शेंगा लागल्यानंतर अळींनी आक्रमण केले. यातून मार्ग काढत पीक वाचविले. सोंगणी सुरू केली. अनेक ठिकाणी पीक सोंगून ठेवण्यात आले. यापूर्वीच मुसळधार पावसाचा तडाखा बसला. शेतात पाणी साचल्याने रचून ठेवलेल्या सूड्या पाण्याखाली गेल्या. या पिकाला अंकुर फुटणे किंवा सडण्याचा धोका व्यक्त होत आहे. बुलढाणा, मोताळा तालुका आणि परिसरात काही भागांत झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, पावसामुळे जनावरांचा चारा वाहून गेला, घरांमध्ये पाणी शिरले, रस्त्यांवर वाहतूक ठप्प झाली आणि गावोगाव वीजपुरवठा खंडित झाला.

कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार काही भागांत जमिनीतील ओल वाढल्याने हरभऱ्याच्या पेरणीस पोषक स्थिती आहे. परंतु ज्या भागात ढगफुटीसदृश पाऊस झाला, तिथे पाणी साचल्यामुळे बियाणे कुजणे, जमिनीची धूप आणि पोत बिघडण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा एकदा बी-बियाणे व खतांवर खर्च करावा लागणार आहे. प्रशासनाकडून नुकसान पंचनाम्याची हालचाल तालुका कृषी अधिकारी यांनी नुकसानीचे प्राथमिक पंचनामे सुरू केल्याची माहिती आहे. शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानभरपाई, बियाणे अनुदान आणि व्याजमाफीची मागणी केली आहे. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव तसेच महायुतीच्या लोकप्रतिनिधींनी नुकसानग्रस्त भागांत पाहणी केली असता अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी परतीचा पाऊस आमचं जगणंच पाण्यात घेऊन गेला अशी व्यथा व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक संकट वाढले आहे. अनेक शेतकऱ्यांकडे मागील दोन-तीन हंगामांपासून कर्जाचा बोजा वाढला आहे. खरीप पिकांचे उत्पादन कमी आणि बाजारभावही अपुरा मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक गणितं कोलमडली आहेत. रबी हंगामात काही दिलासा मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी बियाणे व खत खरेदीसाठी पुन्हा कर्ज घेतले. परंतु पाऊस झाल्याने आता ते बीज वाया गेल्याचे दिसत आहे. या परिस्थितीत शासनाने सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. सरसकट कर्जमाफी योग्य की अयोग्य तर कर्जमाफीचे समर्थन करणाऱ्यांचे मत शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे की ज्या शेतकऱ्यांनी स्वतःच्या कष्टाने शेती टिकवली आहे, त्यांच्यावर नैसर्गिक आपत्ती, महागाई, उत्पादन घट आणि दरकपातीचे संकट एकत्र आले आहे. अशा वेळी शासनाने सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना जगण्यासाठीचा दिलासा द्यावा. कर्जमाफी ही नैसर्गिक आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरू शकते पण ती लक्षित आणि नियोजित असावी. ज्या भागांत शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष नुकसान झाले आहे, त्यांच्यासाठी विशेष कर्जमाफी आणि व्याजमाफी योजना जाहीर करणे उचित ठरेल. त्याचबरोबर शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी शून्य टक्के व्याजदराने नवीन कर्ज उपलब्ध करून देणे, तसेच पीकविमा दाव्यांचा तत्काळ निपटारा करणे आवश्यक आहे. राज्यातील शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा या मागणीसाठी प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी शेतकरी आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात शेतकरी नेते राजू शेट्टी, डॉ. अजित नवले, महादेव जानकर, वामन चटप, रविकांत तुपकर यांच्यासह अन्य नेते सहभागी झाले होते. शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी कर्जमाफीबाबत शासनाची सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे सध्या पहिल्यांदा अतिवृष्टीच्या मदतीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणे आवश्यक आहे.

९८८१७१७८२८

## आजचे संघगीत-३२

मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५

### चालत येइल सहज उद्याचा काळ आपुल्या हाती

चालत येइल सहज उद्याचा काळ आपुल्या हाती ॥धृ.॥

हिंदुपणाची लाज जयांना ते भूमीला भार
हिंदुपणाची अभिमानी या देशाचे आधार
खूणगाठ ही हृदयी बांधुन, पाउल टाकू पुढती ॥१॥

नको कुणाची कृपा फुकाची सौख्य फुलाया येथे
सामर्थ्यावर निर्भर राहुनि ठरू जगाचे नेते
परिस्थितीची नका दाखवू आम्हा पोकळ भीती ॥२॥

माणुसकीचा दिसे फुलोरा वरवर शब्दांतून
अणुगोलाची दाहकता परि डोकवते आतून
आत एक बाहेर एक ही ओळखता जनरीती ॥३॥

देह जपावा हळुवारपणे जीवन कुरवाळावे
विषयामाजी मग्न होउनी समाजास विसरावे
ही तर पशुता सोडुनि घेऊ ऐक्याची अनुभूती ॥४॥

## इतस्ततः


**दत्तात्रेय आंबुलकर**

# भारतीय शिवणाची जागतिक झेप!

ग्राहकांना त्यांचे शरीर व व्यक्तिमत्त्व यानुरूप साजेसे कपडे शिवून देण्याच्या व्यावसायिक उद्दिष्टाने, टेलरस्मार्ट या शिलाई स्मार्टअपची स्थापना करण्यात झाली. गेल्या दशकभराच्या कालावधीत या नावीन्यपूर्ण स्मार्टअपने, चांगलेच नाव आणि यश कमावले आहे. टेलरस्मार्टची सुरुवात २०१४ मध्ये प्रवीण झाडे व जॉय डिसिल्वा या दोन उद्योजकांनी केली. अल्पावधीतच त्यांच्या व्यवसायातील नव्या प्रयोगाला अपेक्षित प्रतिसादही मिळू लागला. नंतर व्यक्तिगत कारणांमुळे, जॉय डिसिल्वा यांनी टेलरस्मार्ट सोडण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे या स्मार्टअपला, एका नव्या उद्योजक सहकार्याची गरज प्रकर्षाने भासू लागली. त्यावेळी टेलरस्मार्टला समर्थ साथ मिळाली ती प्रीतम ओन्स्कर या तेवढ्याच हौशी व उत्साही उद्योजक सहकार्याची. मुख्य म्हणजे, प्रीतम ओन्स्कर हे टेलरस्मार्टचे जुने ग्राहक! टेलरस्मार्टच्या दर्जेदार सेवा व शिवण वैशिष्ट्याची भुरळ पडलेल्या प्रीतम यांनी, टेलरस्मार्टमध्ये सहर्ष भागीदारी स्वीकारली. यानंतर टेलरस्मार्टचा अधिकच दमदार असा प्रवास सुरू झाला, हे विशेष.

एका नव्या व वैशिष्ट्यपूर्ण स्मार्टअपसाठी काम करणाऱ्या प्रीतम ओन्स्कर यांच्या मते, टेलरस्मार्टचे काम एका साध्या व महत्त्वाच्या व्यावसायिक तत्त्वावर चालते. हे मूलभूत व्यवसाय तत्त्व म्हणजे, प्रत्येक ग्राहकाला त्याच्या शरीरयष्टी व मापानुरूप कपडे शिवून देणे. मात्र, हे करतानाच त्या ग्राहकाच्या वैयक्तिक गरजा व प्रचलित प्रगत पद्धतींचा मेळ घालून, प्रत्येक ग्राहकासाठी विशेष स्वरूपाचे व नेमया प्रकारचे कपडे शिवणे याचा अंतर्भाव हे टेलरस्मार्टचे विशेष होत. ही छोटी व महत्त्वाची बाब आमच्या व्यवसायात मोठी परिणामकारक ठरल्याचा उल्लेख, प्रीतम ओन्स्कर आवर्जून करतात. टेलरस्मार्टचे संचालक प्रीतम ओन्स्कर यांच्या मते, मूलतः तयार शिवलेले म्हणजेच रेडिमेड कपडे खरेदी करून त्यांचा प्राधान्याने वापर करणे, ही बाब युरोपसह पाश्चात्त्य देशांमध्ये सर्वमान्य आहे. त्यांच्या मते, भारतामध्ये मात्र तयार कपड्यांच्या संदर्भातील वापर आणि आवड सर्वस्वी वेगळी आहे. यातूनच भारताला जागतिक स्तरावर कपडे शिवण्याच्या व्यवसायात, पुढाकार घेण्यासाठी नेहमीच मोठी संधी असेल, हे लक्षात ठेवायला हवे.



यासंदर्भातील उपलब्ध आकडेवारी व तपशिलानुसार, भारतात सध्या असंघटित व अनौपचारिक स्वरूपात काम करणाऱ्या व कौशल्यप्राप्त अशा शिलाई कामगिरांची संख्या सुमारे तीन कोटींवर आहे. सध्या देशांतर्गत कपड्यांची शिलाई व संबंधित शिवणकाम याद्वारे होणाऱ्या व्यवसायातून, दरवर्षी सुमारे २६ हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. हा व्यवसाय वाढण्यासाठी मोठा वाव आहे, असे जाणकारांचे मत आहे. जागतिक स्तरावर कपडे शिलाई व्यवसायासंदर्भात आज, भारताला प्रथम पसंती दिली जाते. असे होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, आजही भारतात कपडे शिवण्यासाठी लागणारा खर्च जागतिक पातळीवरील खर्चापेक्षा न्यूनतम असतो. परंपरागत व पिढीजात कारागिरी व कौशल्यपूर्ण शिलाईकामामुळे, भारताने तयार कपडे उद्योगात आपले अग्रस्थान कायम राखले आहे. सरकारचे लघुउद्योगांसह अशाप्रकारच्या विविध उद्योगांना सहकार्य करण्याचे धोरणही या यशासाठी पूरक असेच ठरते. भारतात कपडे शिलाई उद्योगांसाठी लागणारे, आवश्यक असे तंत्रज्ञान सहज उपलब्ध आहे.

सध्याच्या सार्वत्रिक स्पर्धेच्या युगात टेलरस्मार्टचे प्रमुख वेगळेपण व वैशिट्ये सांगताना संचालक प्रीतम ओन्स्कर नमूद करतात की, ग्राहकांचे कपडे नेमके व त्यांना हव्या त्या पद्धतीने शिवताना, आमच्या कारागिरांचा अनुभव व कौशल्यांसह शिवण्यासाठी आम्ही ग्राहकांच्या मापाबरोबरच, त्यांची आवड आणि अपेक्षाही लक्षात घेतो. याशिवाय ग्राहकांची आवड व बजेट यांची नेमकी सांगड घालून, त्यांच्या आवडीनुसारच कपड्यांची शिलाई करून देतो. यामुळे ग्राहकांच्या रंगसंगतीपासून सर्वार्थाने त्यांच्या पसंतीचे कपडे, तुलनेने मापक खर्चात त्यांना मिळू शकतात.

टेलरस्मार्टच्या व्यवसाय प्रक्रियेतील पुढचा व ग्राहकांना भावणारा टप्पा म्हणजे त्यांचे शिवून तयार झालेले कपडे, ठरल्या दिवशीच वेळेवर ग्राहकांच्या घरी आवर्जून पोहोचते केले जातात. यासाठी नेहमीच विशेष काळजी घेतली जाते. आज कपडे बाजारातील ब्रॅण्डेड तयार कपड्यांच्या किमतीच्या तुलनेत, आमच्याकडे शिवून दिले जाणारे कपडे किमतीच्या बाबतीत सुमारे ४० टक्के स्वस्त किमतीत उपलब्ध होतात, असा प्रीतम ओन्स्कर यांचा दावा आहे.

या वेगळ्या व्यवसायाची पूर्वपीठिका म्हणजे, पुण्यातील मगरपट्टा येथे २०१७ मध्ये वेगळी कल्पना व ग्राहकांना काहीतरी वेगळे व माफक खर्चात देण्याच्या उद्देशाने याची सुरू झाली. तेव्हा सुरू केलेल्या टेलरस्मार्टकडे केवळ २० टेलरिंग कारागीर जोडलेले होते. मात्र, संचालकांनी जिद्दीने उद्योज वाढवण्यासाठी घेतलेली मेहनत, पाठपुरावा व प्रोत्साहन या साऱ्यांच्या यशस्वी समन्वयामुळेच, सध्या टेलरस्मार्टशी सध्या ८०० टेलर्स जोडले गेले आहेत. सुरुवातीला केवळ पुरुष ग्राहकांच्या कपडे शिवण्यापासून सुरुवात झालेल्या या व्यवसायात, आता महिलांचेही कपडे शिवून मिळतात. यातूनही टेलरस्मार्टचा व्यवसाय वाढण्यास मोठीच मदत झाली आहे. यातूनच खास टेलरस्मार्टसाठी काम करणाऱ्या टेलर्सचे, त्यांच्या व्यवसाय कौशल्यानुरूप वर्गीकरणही करण्यात आले आहे. उदाहरणार्थ टेलरस्मार्टसाठी काम करणाऱ्या टेलर्सपैकी, सुमारे १०० जण केवळ पुरुषांचे कपडे शिवण्यामाधील विशेष तज्ज्ञ झाले आहेत. अशाच प्रकारे अन्य १०० जण महिलांच्या कपड्यांची शिलाई करतात. आपल्या व्यवसायाच्या यशाचे आणखी एक वैशिष्ट्य सांगताना प्रीतम ओन्स्कर आवार्जून नमूद करतात की, त्यांच्या व्यवसाय रचनेत नव्याने सामील होऊ इच्छिणाऱ्या टेलर्सची, कौशल्यविषयक विशेष चाचणीही प्रसंगी घेतली जाते. यासाठी परस्परपूरक वा प्रसंगी सामूहिक कौशल्यांची जोड दिली जाते. यामागे मुख्य उद्देश कुशल कारागिरांच्या कौशल्यातून, ग्राहकांचे संपूर्ण समाधान व त्याद्वारे व्यवसायवाढ साधणे हाच आहे. आता भविष्यात आणखी दर्जेदार कपड्यांचा पुरवठा ग्राहकांना आवडेल, परवडेल अशा स्वरूपात व वाढत्या प्रमाणात करण्याचा प्रीतम ओन्स्कर यांचा मानस आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### शीख धर्माचे संस्थापक, पहिले गुरू गुरुनानक देवजी

आपल्या देशात अनेक थोर समाजसुधारक, साधू-संत, महापुरुष होऊन गेलेत. अनेक धर्मगुरूंनी वेळोवेळी देशातील जनतेला मार्गदर्शन केले व अध्यात्माचा मार्ग दाखविला. शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी त्यापैकीच एक आहेत.

शीख धर्माचे संस्थापक, पहिले गुरू गुरुनानक देवजी यांची जयंती हा शीख समुदायाद्वारे साजरा केला जाणारा सर्वांत सन्मानित दिवस आहे. गुरुनानक यांची जयंती, गुरुनानक देवजी यांच्या जन्माचे स्मरण याला गुरुपूरब, गुरु पर्व असेही म्हणतात. गुरुनानकजी नैतिकता, कठीण परिश्रम आणि सत्यतेचा संदेश देतात. हा दिवस मोठ्या श्रद्धेने आणि सामूहिक भावनेने आणि प्रयत्नाने, जगभरात उत्साहाने साजरा केला जातो. गुरुनानक देवजी यांचे जीवन प्रेम आणि शौर्याने भरलेले होते. ते शीख धर्माचे संस्थापक गुरू आहेत. देशभर त्यांचा जन्म दिन प्रकाश दिन म्हणून कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. गुरुनानकांनी जगाला बंधुभाव आणि प्रेमाचा संदेश दिला. जातिपातीवर त्यांचा विश्वास नव्हता. परिश्रम, निःस्वार्थ प्रेम आणि बंधुभावावर त्यांनी भर दिला. जेव्हा लोक सांसारिक व्यवहारात अडकतात तेव्हा गुरुनानक देवजींनी त्यांना अंतर्मुख होण्याची प्रेरणा दिली हा त्यांचा संदेश होता. ते म्हणाले, परमेश्वराच्या नावाचा विसर पडेल एवढ्या सांसारिक व्यवहारात मग्न होऊ नका. गुरुनानक देवजींनी आपल्या जीवनात विविध देशांचा प्रवास केला आणि त्यांनी अनेक धार्मिक आणि सामाजिक मुद्द्यांवर भाष्य केले. त्यांच्या शिकवणुकीत ईश्वराच्या एका अद्वितीय अस्तित्वावर विश्वास, जातिभेदाच्या विरोधात आवाज आणि सर्व मानवतेसाठी प्रेमाचा संदेश यांचा समावेश आहे. त्यांच्या शिकवणीचे सार एक ओंकार म्हणजेच ईश्वर एक आहे या तत्त्वात सामावलेले आहे.

शीख पंथाचे ते आद्य गुरू होत. गुरुग्रंथ साहेब या धर्मग्रंथात त्यांच्या रचना आहेत. गुरुनानक देवजींच्या जयंतीनिमित्त आपण स्वतःला आठवण करून दिली पाहिजे की आपण सुखी राहूया, इतरांना सुखी ठेवूया, धर्मरक्षणासाठी प्रार्थना, सेवा आणि कार्य करूया. एकता, श्रद्धा आणि प्रेमाचा संदेश देणारे शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### त्रिपुरी पौर्णिमा

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा त्रिपुरी पौर्णिमा म्हणतात. या वर्षी ५ नोव्हेंबरला त्रिपुरारी पौर्णिमा साजरी केली जाणार आहे. या दिवशी शिव मंदिरात त्रिपुर वात लावली जाते. एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो. त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला. या वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. देवांनाही त्याचा पराभव करता येईना. देवांनी भगवान शंकराची प्रार्थना केली. तेव्हा शंकरांनी त्याची तिन्ही नगरे जाळून त्याला ठार केले. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पौर्णिमा असे म्हटले जाऊ लागले. या दिवशी घरात, घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते तसेच नदीत दीपदान करून लोक आनंदोत्सव साजरा करतात. त्रिपुरारी पौर्णिमेला मोठ्या उंच दगडी खांबाला सभोवती दिवे लावण्याची व्यवस्था करून तिथे दिवे लावले जातात. हा दिवस भगवान शंकरांनी जे सामर्थ्य दाखवून त्रिपुरासुराच्या त्रासातून देवांना आणि इतरांना मुक्त केले त्यामुळे हा दिवस दीपोत्सवाच्या रूपात साजरा केला जातो.

**वर्षा आवदे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### येलदरी जलाशयातून पूर्णा नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग सुरु : दोन दरवाजे उघडले

**जिंतूर,/प्रतिनिधी -** पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयातून सोमवारीही दोन दरवाजांच्या माध्यमातून पूर्णा नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग सुरुच आहे.

या जलाशयात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरु आहे. त्यामुळे पाण्याची बऱ्यापैकी आवकही सुरु आहे. पाटबंधारे खात्याने पाण्याची आवक ओळखून या जलाशयातून विद्युत निर्मिती केंद्रास २७०० क्युसेस व दरवाजा क्रमांक १ व १० या दोन दरवाजाच्या माध्यमातून एकूण ४ हजार २२० क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरुच ठेवला आहे. या जलाशयात ४६१.७७२ मीटर इतकी पाण्याची पातळी आहे. ४६२.३८० मीटर ही धोक्याची पाण्याची पातळी आहे.

### नांदापूर येथील शेतकऱ्याने केली आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील नांदापूर येथील परमेश्वर ज्ञानोबा रसाळ या २८ वर्षीय तरुण शेतकऱ्याने शेतातील सततची नापिकी व कर्जफेडीच्या विवंचनेतून गळफास घेऊन आत्महत्या केली. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता ही दुर्दैवी घटना घडली. ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### १५ नोव्हेंबरपासून सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरु राहणार- ५ हजार ३२८ रुपये भाव

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हयात ओला दुष्काळ सदृष्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खरीप पिकांनी शेतकऱ्यांना दगा दिला. त्यातून वाचलेले सोयाबीन, मुग, उडिद शेतकऱ्यांनी मिळेल त्या भावात बाजारात विकण्यास काढले. त्यास हमीभावापेक्षाही कमी भाव खूल्या बाजारात मिळत आहे. त्यामुळे शासनाचे हमीभाव खरेदी केंद्र सुरू होण्याची शेतकरी वाट पाहत होते. आता महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मुंबई आणि नाफेडच्या संयुक्त विद्यामाने केंद्र शासनाने निश्चित केलेल्या हमीभाव दराने खरेदी केंद्र येत्या १५ नोव्हेंबरपासून जिल्हयात सुरू होणार आहेत.

केंद्राने जाहीर केलेल्या हमीभावानूसार मुग ८ हजार ७३६ रू.प्रतिक्विंटल, उडीद ७ हजार ८०० रू.प्रतिक्विंटल आणि सोयाबीन ५ हजार ३२८ रूपये प्रतिक्विंटल दराने खरेदी करण्यात येणार आहे. जिल्हयात जिंतूर तालुका जिनिंग ॲण्ड प्रेसींग सहकारी सोसायटी लिमिटेड जिंतूर, पुर्णा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ पूर्णा, मानवत तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मानवत, स्वप्नभूमी सुशिक्षीत बेरोजगार सेवा संस्था सोनहारी वेअर हाऊस शेळगाव ता.सोनपेठ, तुळजा भवानी कृषि विकास सेवा सहकारी संस्था मर्यादीत बोरी, परभणी तालुका सहकारी खरेदी विक्री सेवासंघ परभणी, नवा मोंढा परभणी, भूमिपुत्र फळे व भाजीपाला खरेदी, विक्री व प्रसंस्करण सहकारी संस्था वरपुड ता.परभणी आणि कृषीराज फळे आणि भाजीपाला खरेदी, विक्री व प्रसंस्करण सहकारी संस्था मर्यादीत मिरखेल, झरी ता.परभणी या खरेदी केंद्रांवर हमीभावाने खरेदी करण्यात येणार आहे. हमीभाव खरेदी केंद्रावर शेतकर्यांनी शेतमाल विक्रीस आणण्यापूर्वी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असून त्यासाठी आधारकार्ड, बँक पासबुक, सातबारा उतारा, पिक पेरा आदी कागदपत्रांसह शेतकर्याने प्रत्यक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच खरेदीसाठी मोबाईल क्रमांकावर संदेश प्राप्त झाल्यानंतरच शेतमाल विक्रीसाठी केंद्रावर आणण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी कुंडलिक शेवाळे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष रोहित निकम आणि व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे पाटील यांनी केले आहे.

### गंगाखेड राष्ट्रवादी काँग्रेसला नवे नेतृत्व अलाउद्दीन शेख यांची शहराध्यक्षपदी निवड




**गंगाखेड,/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संघटनात्मक बळकट करण्यासाठी गंगाखेड शहराध्यक्षपदी शेख अलाऊद्दीन यांची निवड केली आहे.या नियुक्तीमुळे गंगाखेड शहरातील राष्ट्रवादीच्या कार्यात नवसंजीवनी येणार असल्याची प्रतिक्रिया कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे. अलाऊद्दीन शेख यांना नियुक्तीपत्र पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार राजेश विटेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.याप्रसंगी तालुकाध्यक्ष उद्धव सातपुते, सभापती साहेबराव भोसले,युवक जिल्हाध्यक्ष रोहन सामाले, माधवराव भोसले,बाळासाहेब बोडके, लखन(बंटी) राठोड, प्रदीप भोसले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी आमदार विटेकर म्हणाले, ''गंगाखेड शहरात राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन मजबूत करण्यासाठी तरुण, निष्ठावंत आणि कार्यक्षम नेतृत्वाची गरज होती. शेख अलाऊद्दीन यांच्या नेतृत्वाखाली पक्ष नवे यश मिळवेल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.''नवीन शहराध्यक्ष शेख अलाऊद्दीन यांनी विश्वास व्यक्त केला की, ''पक्ष नेतृत्वाने माझ्यावर दाखविलेला विश्वास मी सार्थ ठरवीन. गंगाखेड शहरात राष्ट्रवादी काँग्रेसची विचारधारा प्रत्येक घरापर्यंत पोहोचवून येणाऱ्या निवडणुकांत पक्षाचा झेंडा उंचावू.'' निवडीबद्दल अलाउद्दीन शेख यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# मुलांमधील असंसर्गजन्य आजार रोखण्यासाठी एसओपी तयार करणार - राज्यमंत्री मेघना साकोरे

**मोहन धारासूरकर**

**परभणी/प्रतिनिधी -** राज्यातील जनतेचे आरोग्य सदृढ राहावे आणि सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याच्या सुविधा विनासायास उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य शासन सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात अनेक उपक्रम राबवत आहे. याच पार्श्वभूमीवर मुलांमधील असंसर्गजन्य आजार रोखण्यासाठी सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना (एसओपी) तयार करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले. मुलांमधील असंसर्गजन्य आजार एक वाढती समस्या या विषयी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. कार्यशाळेस युनिसेफचे संजय सिंह, आरोग्य सेवा संचालक, डॉ. विजय कंदेवाड (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृदुला फडके, 'युनिसेफ'चे डॉ. मंगेश गाधारी उपस्थित होते. काही लोकप्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, सुदृढ बालके आपल्या देशाचे भविष्य असून त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे उज्ज्वल भविष्यासाठी गुंतवणूक करणे आहे. मुलांमधील असंसर्गजन्य आजार याविषयी अधिक व्यापक जनजागृती होण्यासाठी अधिवेशन काळात विधिमंडळ सदस्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली जाईल असेही त्यांनी सांगितले. राज्याचा आरोग्य विभाग व युनिसेफ यांच्यामार्फत आरोग्यदायी बालपण ही संकल्पना राबविण्यात येणार असून यामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग व पुढाकार महत्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.




राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, आधुनिक जीवनशैली, बदलती आहार पद्धती आणि शारीरिक निष्क्रियतेमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, मानसिक ताणतणाव यासारखे असंसर्गजन्य आजार वाढत आहेत. यावर मात करण्यासाठी समाज, शाळा, पालक आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी महत्वाची आहे. आपल्या भागातील प्रत्येक बालक सृदृढ, निरोगी राहावे, ते शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असावे यासाठी आरोग्य विभागामार्फत राबविण्यावर येणारे उपक्रम यशस्वीपणे राबिण्यावर भर देण्यात यावा. तसेच शाळांमध्ये नियमित आरोग्य तपासणी शिबिरे, तंदुरुस्त बालपण मोहीम आयोजन, पौष्टिक आहार आणि शारीरिक क्रियाशीलतेबाबत जनजागृती आणि मुलांच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे, असे आवाहन त्यांनी केले.

आधुनिक जीवनशैली, असंतुलित आहार आणि शारीरिक निष्क्रियतेमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा, मधुमेह, अस्थमा, मानसिक आरोग्य या समस्या आणि रक्तविकार झपाट्याने वाढत आहेत. भावी पिढीसाठी ही चिंतेची बाब असून लोकप्रतिनिधी, शाळा, पालक सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन या आजाराविरुद्ध यशस्वी लढा देण्यात पुढाकार घ्यावा. महाराष्ट्र राज्याने बाल मृत्यूदर कमी करण्यात देशाला दिशा दिली आहे. त्याचप्रमाणे बालकामधील असंसर्गजन्य आजार रोखण्यासाठी राज्याने दिशादर्शक असे काम करावे, अशी अपेक्षा युनिसेफचे डॉ. संजय सिंह यांनी यावेळी व्यक्त केली. किशोरवयीन मुलांमध्ये अस्थमा, लठ्ठपणा, मधुमेह वाढत आहे असे सांगून डॉ. मृदला फडके म्हणाल्या असंसर्गजन्य आजारांबाबत व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. असंसर्गजन्य आजारात किशोरवयीन मुलींच्या आरोग्यावर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे असल्याचेही त्या म्हणाल्या. यावेळी युनिसेफचे डॉ. मंगेश गाधारी आणि आरोग्य सेवा संचालक यांनीही मनोगत व्यक्त केले.

## प्रशासन - पत्रकारांच्या समन्वयातुन समाजहित साधावे - जिल्हाधिकारी चव्हाण

### जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रम



**परभणी,/प्रतिनिधी :** प्रशासन - पत्रकारांच्या समन्वयातुन समाजहित साधावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद सलग्न जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने आज शनिवार १ नोव्हेंबर रोजी आयोजीत दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार सुभाष कच्छवे तर प्रमुख पाहुणे म्हणुन वनामकृवीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणि, अप्पर आयुक्त संभाजीनगर डॉ. प्रताप काळे, राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष नानासाहेब भेंडेकर, राजु काजे,महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश गोरे, प्रा. सुनिल तुरूकमाने, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दीपके, राज्य कार्यकारिणी सदस्य राजू हट्टेकर, कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर, कोषाध्यक्ष मोईन खान, यांची उपस्थिती होती.0

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण म्हणाले की, पत्रकारांनी खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणत समाजविकासात आपले योगदान दिले पाहिजे. प्रशासन - पत्रकारांच्या समन्वयातुन चांगल्या प्रकारे समाजहित साधल्या जाऊ शकते. समाजातील गरजवंतांचे प्रश्न सुटू शकतात असेही ते म्हणाले. पत्रकारांसोबत असलेला सुसंवाद हा प्रशासनाच्या दृष्टीनेही फायद्याचा असतो असेही जिल्हाधिकारी म्हणााले. वनामकृवीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी जगात जर्मनी भारतात परभणी अशी सकारात्मक ओळख दूरवर पोहचत असल्याचे म्हटले. पत्रकारांच्या सहकार्यामुळे वनामकृवीने केलेले संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती संभाजी नगरचे अप्पर आयुक्त डॉ. प्रताप काळे यांनी परभणी येथील आपल्या कार्यकाळात पत्रकारांसोबत सुसंवाद राहिला. परभणीकरांकडूनही प्रेम मिळाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परभणी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके यांनी केले. सूत्रसंचालन राहुल वहिवाळ तर आभार शेख इप्तेखार यांनी मानले. कार्यक्रमास पत्रकारांची मोठी उपस्थिती होती.

## यादीत बोगस मतदारांचा भरणा असल्याची तक्रार

**मानवत/प्रतिनिधी -** नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ११ मध्ये मोठ्या प्रमाणावर बोगस मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात फुलेनगर येथील नागरिक रविकुमार आसाराम पंडित यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

प्रभाग क्रमांक १० मधील अनेक नागरिकांची नावे जाणूनबुजून प्रभाग क्रमांक ११ मध्ये टाकण्यात आली असून, संबंधित नागरिकांचा प्रभाग ११ मध्ये कोणताही वास्तव्याचा संबंध नाही. याशिवाय, मानवत तालुक्यातील काही ग्रामीण भागातील मतदारांची नावेही प्रभाग क्रमांक ११ मध्ये दाखल करण्यात आली आहेत. अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात केली आहे.

## गोदावरी नदीच्या पात्रात बुडून परभणीच्या दोघा युवकांचा मृत्यू: शिरोरी जवळील दुर्देवी घटना:

**परभणी,/प्रतिनिधी :** सोनपेठ तालुक्यातील शिरोरी येथील लुल्ला मासाब दर्गा येथील कंदुरीच्या कार्यक्रमाकरीता परभणीतून आलेल्या दोघा युवकांचा गोदावरी नदीच्या पात्रात बुडून मृत्यू झाला. ही दुर्दे वी घटना रविवार २ नोव्हेंबर रोजी घडली. दरम्यान, त्या दोघांपैकी एका युवकाचा रविवारी सायंकाळी ४ वाजता तर दुसऱ्या युवकाचा सोमवारी दुपारी १२ वाजता मृतदेह आढळून आला.

परभणी येथील धार रस्त्यावरील गांधी नगरातील रौफ खान करीम खान (वय २५) व शेख सोफियान शेख जावेद (वय १६) हे दोघे युवक नातेवाईकाच्या कंदुरीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिरोरी येथील दर्गाह येथे पोहेचले होते. तेथून हे दोघे गोदावरी नदीच्या पात्राकडे फिरकले अन् पोहण्याचा मोह आल्याने हे दोघेही नदीपात्रात उतरले. परंतु, पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही गटांगळ्या खावून नदीत बुडून मृत्यू पावले. नदीकाठी कलई चालविणाऱ्या व्यक्तींना त्या दोघांचे कपडे आढळले परंतु, ते दोघे दिसले नाहीत, तेव्हा शंका आल्याने चौकशी सुरु झाली. सोनपेठ पोलिसांना या संदर्भात तात्काळ माहिती कळविण्यात आली. पोलिस व ग्रामस्थांनी संयुक्तपणे सायंकाळी शोध मोहिम सुरु केली तेव्हा सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास शेख सुफियान या युवकाचा मृतदेह हाती आला तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास रौफ खान या युवकाचा खळीजवळ नदीपात्रात मृतदेह आढळून आला. सदर प्रकरणात अशा प्रकारे घटना घडल्यानंतर गावात शोककळा पसरली होती.

## जिल्हयात बोचऱ्या थंडीमुळे आजारात वाढ

**परभणी/प्रतिनिधी -** जिल्हयात गेल्या काही दिवसापासून ऊन, रिमझिम पाऊस आणि बोचरी थंडी असा वातावरणाचा लहरीपणा जाणवत आहे. त्यामुळे नागरिक, लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गंभीर आजाराचे रुग्ण यांना या वातावरणाचा मोठा त्रास होत आहे. त्यामुळे या वातावरणात सध्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य खात्याने केले आहे.

## पाथरी बाजार समिती सभापती नखाते यांच्याविरुध्द अविश्वास ठराव

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी येथील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिल नखाते यांच्या विरुध्द शुक्रवारी (दि.३१) बहुतांशी संचालकांनी अविश्वास ठराव दाखल केला.

गेल्या काही महिन्यांपासून नखाते यांच्या विरोधात अविश्वास ठराव आणण्या संदर्भात हालचाली सुरु होत्या. मध्यंतरी त्या संबंधीचा ठरावसुध्दा दाखल होणार होता. परंतु, पुरेसे संख्याबळ न जोडले गेल्याने ठराव येण्यापूर्वीच बारगळला. मात्र, माजी आमदार व काँग्रेस जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. ३१) बहुतांशी संचालकांनी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला.

संचालकांनी सादर केलेल्या अविश्वास प्रस्तावात मनमानी पद्धतीने कामकाज करणे, बाजार



समितीच्या हिताच्या निर्णयांकडे दुर्लक्ष करणे, स्वतःच्या कुटुंबियांना योजनांचे लाभ मिळवून देणे आणि संचालकांचा विश्वास गमावणे आदी कारणे नमूद करण्यात आली आहेत. या प्रस्तावावर माजी आमदार दुर्राणी व सईद खान यांच्या गटातील संचालकांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामध्ये एकनाथ घांडगे, किरण टाकळकर, संतोष गल्बे, संजीव सत्वधर, गणेश दुगाणे, शेख दस्तगीर शेख हसन, शाम धर्मे, विजयकुमार शिताफळे, अशोक आरबाड, संदिप टेंगसे, आनंद धनले आणि सयद गालीब सयद इस्माईल यांचा समावेश आहे. या अविश्वास ठरावामुळे पाथरी बाजार समितीतीलच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.

## त्या आधार केंद्रांची टंचाई, जिंतूर तालुक्याच्या नागरिकांना दिलासा कधी?''

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी -** तालुक्यातील नागरिकांना आधार नोंदणी, मोबाईल लिंकिंग आणि बायोमेट्रिक अपडेटसाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागात आधार केंद्रांची संख्या अत्यल्प असल्याने महिला, शेतकरी, विद्यार्थी आणि वृद्ध नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहून त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव अडे (जिंतूर) यांनी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी परभणी यांना ईमेलद्वारे निवेदन सादर केले आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार क्रमांक मोबाईलशी लिंक असणे आणि बायोमेट्रिक अपडेट आवश्यक आहे. विशेषतः ''लाडकी बहीण योजना'', ''महात्मा फुले जनआरोग्य योजना'' आणि ''शिष्यवृत्ती योजना'' अशा लाभदायक योजनांमध्ये बायोमेट्रिक अपडेटशिवाय प्रक्रिया पूर्ण होत नाही. मात्र मर्यादित केंद्रांमुळे अनेकांना वेळेत नोंदणी व पडताळणी करता येत नाही. परिणामी नागरिकांना योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. शाळा स्तरावर विद्यार्थ्यांच्या बायोमेट्रिक अपडेटसाठी देखील प्रचंड अडचणी आल्याने शिक्षक व पालक दोघेही त्रस्त आहेत.

अडे यांनी त्यांच्या निवेदनात जिल्हाधिकारी साहेबांना पुढील ठोस मागण्या केल्या आहेत . जिंतूर तालुक्यात अधिकाधिक आधार नोंदणी व अपडेट केंद्रे सुरू करावीत. प्रत्येक प्रमुख ग्रामपंचायत स्तरावर किमान एक स्थायी आधार नोंदणी केंद्र स्थापन करावे. महिला व विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत. सर्व केंद्रांवर पुरेशी यंत्रसामग्री व प्रशिक्षित कर्मचारी नेमावेत.ही मागणी केवळ एका कार्यकर्त्याची नसून संपूर्ण तालुक्याच्या नागरिकांची व्यथा आहे. शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचावा, यासाठी आधार सेवा सर्वांसाठी सहज उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागात डिजिटल सेवा वाढविण्याचे अनेक दावे केले जातात, पण प्रत्यक्षात सुविधा पोहोचण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. आता प्रश्न असा आहे नागरिकांच्या या वेदनेचा आवाज जिल्हा प्रशासन ऐकेल का? आधार केंद्रांची संख्या वाढविण्याचा निर्णय विलंब न लावता घेतला गेला, तर तो हजारो नागरिकांसाठी दिलासादायक ठरेल. अन्यथा ''डिजिटल इंडिया''चा नारा फक्त कागदावरच राहण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## सेलूतील धोकादायक रस्त्यावर गतिरोधक बसवा; अन्यथा जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील रायगड कॉर्नर ते रेल्वे गेट हा रस्ता वाहतूकीसाठी अत्यंत धोकादायक झाला असून या रस्त्यावर तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावेत, अन्यथा ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मोरेगाव येथील दुधना नदीत जलसमाधी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संतप्त सेलूकरांनी नगर परिषद मुख्याधिकारी आणि राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ बी चे अभियंता यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

शहरातील रायगड कॉर्नर ते रेल्वे गेट हा रस्ता अत्यंत धोकादायक झाला असून, या रस्त्यावर गतिरोधक नसल्याने वाहने भरधाव वेगाने धावत आहेत. त्यामुळे या रस्त्यावर अनेक अपघात होऊन काही नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. या गंभीर परिस्थितीचा विचार करून तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर जयसिंग शेळके, विनोद धापसे, मोहन मोरे, कृष्णा पडघन, वसंत आवटे, निशिकांत रोडगे, शाम रोडगे, मारोती ढोले, उध्दव डूबल आणि उत्तम लोखंडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## बसस्थानकात पर्स चोरी, ८४ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**



फिर्यादी शामल लक्ष्मण खैरे (वय ४०, रा. हिंगळजवाडी, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२७ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारास १०.३० वा. धाराशिव बसस्थानक येथे धाराशिव-बार्शी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील बटव्यातील २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ९,००० रुपये असा एकूण ८४,००० रुपयांचा ऐवज चोरीला नेला.

या प्रकरणी फिर्यादीने दि.३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### अक्षरवेल महिला साहित्य मंडळाच्या 'अंकुर' दिवाळी अंकाचे प्रकाशन

**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

अक्षरवेल महिला साहित्य मंडळाच्या अंकुर या दिवाळी अंकातील बालसाहित्य विशेषांकाचे प्रकाशन सन्माननीय तहसीलदार मृणाल जाधव यांच्या हस्ते मुक्तांगण शाळेच्या प्रांगणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. कमल नलावडे होत्या. जाधव मॅडमनी साहित्य, वाचन व सकारात्मकतेचे महत्त्व अधोरेखित करत आत्मोन्नतीसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. मंडळाच्या सामाजिक उपक्रमांचे तसेच साहित्यिक कार्याचे त्यांनी कौतुक करून आगामी अंकासाठी अर्थसहाय्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविक अध्यक्षा डॉ. सुलभा देशमुख यांनी केले. कार्यक्रमात ज्योती कावरे, जना फासे, सारिका देशमुख आणि सविता गुंड यांच्या साहित्यकृतींचे प्रकाशन होऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सुनीता गुंजाळ यांनी केले तर आभार प्रा. वैशाली बोबडे यांनी मानले.

### अमन शेख यांची वंचित बहुजन आघाडी कळंब शहराध्यक्षपदी निवड

**कळंब, दि.४ नोव्हेंबर -**

येथील सामान्य कुटुंबातील, प्रामाणिक व समाजाभिमुख कार्यासाठी ओळख असलेले अमन (अमान भाई)



शेख यांची कळंब वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर बोलताना त्यांनी म्हटले की, येणाऱ्या काळात पक्ष अधिक बळकट करण्यासाठी आणि समाजाच्या प्रश्नांवर ठोस पातळीवर काम करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. वंचित समाजाला नवी दिशा देणे हेच आमचे उद्दिष्ट असेल. त्यांच्या या निवडीबद्दल मित्रपरिवार, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला आहे.

### नगराध्यक्ष पदासाठी सुनिल उकंडे यांची भाजपकडे उमेदवारीची मागणी

**नळदुर्ग, दि.४ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून उमेदवारी दिल्यास निवडणूक पूर्ण ताकदीने लढवून नगरपालिकेवर




भाजपचा झेंडा फडकविण्याचा निर्धार सामाजिक कार्यकर्ते व भोई समाजाचे शहराध्यक्ष सुनिल उकंडे यांनी व्यक्त केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, शहराचा सर्वांगीण विकास हा माझा एकमेव हेतू असून राजकारणातून पैसे कमविण्यासाठी नव्हे तर विकासासाठी मी निवडणूक लढविणार आहे. गेल्या ३७ वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेले आणि १५ वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या उकंडे यांनी नगरपालिकेत भ्रष्टाचारमुक्त, स्वच्छ व पारदर्शक प्रशासन उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. सध्या आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहरात सुरू असलेला विकास पुढे नेण्यासाठीच आपली उमेदवारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### गोळाफेक स्पर्धेत दीक्षा बोनेचे घवघवीत यश

**अणदूर, दि.४ नोव्हेंबर -**

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित श्री बाळेश्वर विद्यालय, बारुळ येथील विद्यार्थिनी दीक्षा शिवमूर्ती बोने



हिने विभागीय स्तरावरील गोळाफेक स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर दीक्षा हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दीक्षाच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव रामचंद्र (दादा) आलुरे, मार्गदर्शक प्रा. भालचंद्र बिराजदार, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. लक्ष्मीकांत पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक मंगेश अणदुरकर, तसेच विद्यार्थिनीचे वडील शिवमूर्ती बोने यांनी अभिनंदन केले. दीक्षाला मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक विठ्ठल नाईक यांच्या कार्याचेही विशेष कौतुक करण्यात आले असून, विद्यालय परिवाराकडून तिला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### अतिवृष्टीत नुकसानग्रस्त वीजवाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी द्यावा

**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे वीज वाहिन्या, रोहित्र आणि पोलचे मोठे नुकसान झाले असून, दुरुस्तीकरिता विशेष निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी भारतीय किसान संघ, धाराशिव यांनी ऊर्जाराज्यमंत्री मेघनाताई बोर्डिकर यांच्याकडे केली. जिल्हाध्यक्ष नितीन घुले यांनी मंत्र्यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. या निवेदनात जळालेल्या डीपी, वाहून गेलेल्या वीजतारा, रोहित्रातील तेल भरणे तसेच RDSS योजनेत नवीन कामांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली.

# धाराशिव जिल्ह्यात हजार उद्योजक घडवण्याचे स्वप्न : आ. सुभाष देशमुख

## लोकमंगल बँक व मल्टीस्टेटतर्फे कर्ज मेळावा व दिवाळी स्नेहफराळ कार्यक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -**

शासनाच्या अनेक लाभदायक योजना उपलब्ध आहेत. नोकरी मिळेलच याची वाट पाहण्यापेक्षा उद्योजक बनून स्वतःचा व्यवसाय सुरू करा. धाराशिव जिल्ह्यातून किमान एक हजार उद्योजक घडवण्याचे माझे स्वप्न आहे, त्यासाठी सर्वांनी पुढे यावे, असे प्रतिपादन लोकमंगलचे संस्थापक अध्यक्ष व आमदार सुभाष देशमुख यांनी केले.




लोकमंगल बँक आणि लोकमंगल मल्टीस्टेट यांच्या वतीने धाराशिव येथे कर्ज विषयक मेळावा व दिवाळी स्नेहफराळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना आमदार सुभाष देशमुख म्हणाले, केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक योजना उपलब्ध आहेत. सावकाराच्या जाळ्यात अडकण्याऐवजी या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक सक्षम व्हा. स्वतःबरोबर आपले गाव आणि जिल्हाही आर्थिकदृष्ट्या सक्षम करा. रोहन देशमुख म्हणाले, प्रत्येक कार्यकर्त्याने किमान पाच उद्योजक तयार केले, तर धाराशिव जिल्हा 'उद्योजकांचा जिल्हा' म्हणून ओळखला जाईल.

यावेळी सुभाष देशमुख यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, आपण सोलापूरात गेलो असलो तरी उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्याशी आपली नाळ तुटलेली नाही.

या कार्यक्रमात विविध महामंडळांकडून पाच कोटी रुपयांच्या धनादेशांचे वाटप करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

या कार्यक्रमास चेअरमन पंडित लोमटे, बालाजी शिंदे, सचिन आडगळे, राजेंद्र पाटील, अजय ढोणे, पांडुरंग डोलारे, तसेच लोकमंगल मल्टीस्टेटचे सीईओ सचिन जाधव, रामदास कोळगे, विक्रम (मालक) देशमुख, संतोष बोबडे, ॲड. दीपक आलूरे, सचिन पाटील सभापती, सज्जन साळुंखे, प्रभाकर मुळे, आनंद कंदले यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व लोकमंगल मल्टीस्टेटचे सल्लागार, कर्जदार, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यातील ८ नगरपालिका, २ नगर पंचायतींचे अखेर बिगुल वाजले

### २ डिसेंबरला मतदान ३ तारखेला मतमोजणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला आहे. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या असून धाराशिव जिल्ह्यातील ८ नगरपालिका आणि २ नगर पंचायतींमध्ये होणार निवडणुका पार पडणार आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर,परंडा, कळंब,भूम, उमरगा, मुरूम आणि नळदुर्ग या आठ नगरपालिकासह लोहारा आणि वाशी दोन नगर पंचायतींमध्ये या निवडणुका पार पडणार आहेत. महाराष्ट्र राज्यभरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार नामांकन अर्ज १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालावधीत दाखल करता येतील. अर्जाची छाननी१८ नोव्हेंबर, अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २५ नोव्हेंबर, मतदान २ डिसेंबर तर मतमोजणी ३ डिसेंबर होणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदेत सांगितले आहे.




धाराशिव जिल्ह्यातील सर्व नगरपालिका नगरपंचायत क्षेत्रातील आजी-माजी नगरसेवक तसेच भावी नगरसेवकांची भाऊ गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून येत असून सर्वच शहरातील वातावरण नगरपालिकांसाठी तयार झालेले दिसून येते आहे.


दीपावलीमध्ये मोठ्या प्रमाणात दिवाळी फराळ यासह विविध सांस्कृतिक उपक्रम राबवत अनेक इच्छुकांनी निवडणूक लढण्याची आपापली इच्छा व्यक्त केली आहे.

## शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळालाच पाहिजे : पालकमंत्री सरनाईक

### पवनचक्की उभारणीतील 'मध्यस्थ दलाल' सुळसुळाट थांबवण्याचे जिल्हा प्रशासनाला आदेश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात पवनचक्की उद्योगाचा वेगाने विस्तार होत असून, या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या जमिनी घेताना त्यांना योग्य मोबदला मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र, कंपनी आणि शेतकरी यांच्यामध्ये 'मध्यस्थ' या नावाखाली दलालांचा वाढलेला सुळसुळाट तात्काळ बंद करावा, असे स्पष्ट आदेश परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.



मंत्रालयातील आपल्या दालनातून आयोजित ऑनलाईन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, संबंधित विभागांचे अधिकारी, पवनचक्की कंपन्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते. पालकमंत्री सरनाईक म्हणाले की, पवनचक्की उभारणीसाठी शेतकऱ्यांची जमीन घेताना संबंधित कंपनीकडून त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. यासाठी प्रशासनानेच मध्यस्थाची भूमिका बजावावी. दलालांकडून गुंडगिरी, धमक्या आणि शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी मिळाल्या असून, पोलिसांनी तक्रारीची वाट न पाहता 'सुओ मोटू' गुन्हे दाखल करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

तसेच, शेतकऱ्यांचे हित जपत जिल्ह्यातील पवनचक्की उद्योगाला आवश्यक सहकार्य प्रशासनाने करावे, असेही त्यांनी सांगितले. या उद्योगातून धाराशिव जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधता येईल. मात्र, त्यात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहणे गरजेचे आहे, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## ॲड. आशिष शेलार यांचे श्री तुळजाभवानी देवी दर्शन

### तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या कामांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -**

राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज तुळजापूर येथे आगमन करून श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत मंदिर परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली.



यावेळी तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चना पाटील, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, सहायक संचालक जया वहाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नीलेश देशमुख, पाळीकर पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## वरुड्यात १.११ लाखांचा अवैध दारू साठा जप्त

**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

वरुडा येथे पोलिसांनी कारवाई करून १ लाख ११ हजार ६१० रुपयांचा अवैध दारू साठा जप्त केला आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अलंकार रोहीदास (वय ४०) व मकबुल आब्बु मुलानी (वय ५५, रा. तेर) यांनी दि.३ नोव्हेंबर रोजी सायं. ७.४५ वा. वरुडा ते तेर रस्त्यालगत जिल्हा परिषद शाळेजवळ अल्टो कारमधून देशी-विदेशी दारूचा एकूण १.११ लाख रुपये किंमतीचा १३० बाटल्यांचा साठा विक्रीसाठी ठेवला होता.

## उमरगा व धाराशिव तालुक्यात दोन बालविवाह रोखण्यात चाईल्ड हेल्पलाईन टीमचे यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध मोहिमेअंतर्गत चाईल्ड हेल्पलाईन (CHILD HELPLINE १०९८) टीमने तत्परतेने कार्यवाही करत उमरगा तालुक्यातील एकुरगा आणि धाराशिव तालुक्यातील जहागीरदार वाडी येथे होणारे दोन बालविवाह रोखण्यात यश मिळवले.



एकुरगा येथील १७ वर्षीय व जहागीरदार वाडी येथील १६ वर्षीय अल्पवयीन बालिकांचे विवाह होणार असल्याची माहिती हेल्पलाईनला मिळाल्यानंतर तातडीने दोन्ही ठिकाणी स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली. तपासणीत दोन्ही बालिकांचे वय विवाहासाठी अपुरे असल्याचे स्पष्ट झाले.

सदर कारवाई किशोर गोरे, प्रभारी महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, अमोल कोवे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी आणि विकास चव्हाण, जिल्हा प्रकल्प समन्वयक (CHL) यांच्या आदेशानुसार पार पडली. या मोहिमेत अशोक चव्हाण, अभयसिंह काळे, पल्लवी पाटील, अमर भोसले तसेच ग्रामसेवक दयानंद कोळी (एकुरगा), ए.बी. माने (जहागीरदार वाडी) आणि दोन्ही गावांतील ग्राम बाल संरक्षण समित्यांचे सदस्य यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## सरमकुंडीत युवकाकडे विनापरवाना तलवार

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ नोव्हेंबर -**

सरमकुंडी (ता. वाशी, जि. धाराशिव) येथील दशरथ लाला काळे (वय २५) हा युवक आपल्या राहत्या घरात पितळी मुठ असलेली अंदाजे १,५०० रुपये किंमतीची तलवार विनापरवाना व बेकायदेशीर रित्या जवळ बाळगून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दि.३ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारे १.५० वाजता पोलिस पथकाने ठिकाणी धाड टाकून संबंधित तलवार जप्त केली.

## शेतकरी कन्या पल्लवी डाकवाले यांची सहाय्यक राज्यकर आयुक्त पदावर निवड

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ नोव्हेंबर -**

मोठे स्वप्न पाहण्याची जिद्द आणि त्यासाठी मेहनतीची तयारी असेल, तर यश नक्की मिळते, हे सिद्ध केले आहे परंडा तालुक्यातील आवार पिंपरी येथील आल्पभूधारक शेतकरी दांपत्याच्या कन्या पल्लवी डाकवाले-मारकड यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या एमपीएससी परीक्षेच्या निकालात पल्लवी डाकवाले / मारकड यांची सहाय्यक राज्यकर आयुक्त (ssistant Commissioner of State Tax), वर्ग-१ अधिकारी म्हणून निवड झाली आहे. पल्लवी यांच्या



घरची परिस्थिती साधी असून, आई-वडिलांनी शेतात काबाडकष्ट करून त्यांना शिक्षण दिले.

जिद्द, चिकाटी, अभ्यासात सातत्य आणि पती गणेश मारकड (State Tax Inspector) यांचा पाठिंबा या बळावर त्यांनी यशाची शिखरकेली आहेत.

## उमरगा-लोहारा तालुक्यातील ४५ हजार शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदान रखडले

### सात नोव्हेंबरला लोहारा तहसीलसमोर धरणे आंदोलन... शेतकरी नेते अनिल जगताप यांची घोषणा...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ नोव्हेंबर -**

गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीनंतर शासनाने उमरगा व लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत म्हणून मोठ्या प्रमाणात अनुदान जाहीर केले होते. मात्र तीन महिन्यांनंतरही सुमारे ४५ हजार शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले असल्याने, येत्या सात नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दिली.

गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीनंतर दुसऱ्या टप्प्यात उमरगा-लोहारा तालुक्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. विविध आंदोलने आणि पाठपुराव्यानंतर राज्य शासनाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय (जीआर) काढून या दोन्ही तालुक्यांसाठी एकूण ८६ कोटी ४६ लाख ३४ हजार रुपयांचे अनुदान मंजूर केले होते. त्यापैकी उमरगा तालुक्यातील ४९,२२८ शेतकऱ्यांना ५२ कोटी ७५ लाख रुपये, तर लोहारा तालुक्यातील ३०,६५२ शेतकऱ्यांना ३३ कोटी ७० लाख रुपये मंजूर करण्यात आले. परंतु शासन निर्णयाला तीन महिने उलटूनही अद्यापपर्यंत उमरगा व लोहारा तालुक्यातील ४४ हजार शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत. आत्तापर्यंत उमरगा तालुक्यातील २०,७४३ शेतकऱ्यांना २२ कोटी ५० लाख रुपये, तर लोहारा तालुक्यातील १६,२२७ शेतकऱ्यांना १८ कोटी ४९ लाख रुपये वाटप झाले आहे.

शेतकरी नेते जगताप यांनी सांगितले की, शासन व प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही उर्वरित शेतकऱ्यांना अनुदान वितरित झालेले नाही. त्यामुळे आम्ही ७ नोव्हेंबर रोजी लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार आहोत.

या संदर्भात उपविभागीय अधिकारी उमरगा, तहसीलदार लोहारा आणि पोलिस ठाणे लोहारा यांना निवेदन देण्यात आले आहे. तसेच १ ऑक्टोबरपासून राज्य शासनाने ई-केवायसी पोर्टल बंद केल्याने शेतकऱ्यांमध्ये गोंधळ व अस्वस्थता निर्माण झाली आहे. शासनाकडून याबाबत कोणतीही स्पष्टता न दिल्याने आंदोलनाची वेळ आली असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले.

अनुदानापासून वंचित असलेल्या उमरगा आणि लोहारा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तुळजापूर शहर स्वच्छतेच्या ठेक्यात लाखोंचा अपहार; मुख्याधिकारी व ठेकेदार कंपनीवर आरोप

## सुनील घाडगे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, चौकशी व फौजदारी गुन्ह्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -**

नगर परिषदेच्या शहर स्वच्छतेसाठी देण्यात आलेल्या ठेक्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप समाजसेवक सुनील घाडगे यांनी केला आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात मुख्याधिकारी व स्वच्छता ठेकेदार कंपनी यांच्यावर संगनमत करून दरमहा लाखो रुपयांचा अपहार केल्याचा ठपका ठेवला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नगर परिषद तुळजापूर व शासनाची दिशाभूल करून दरमहा २५ लाख २८ हजार ४०० रूपये इतक्या रकमेचा अपहार केला जात असून, याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंदवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहर स्वच्छतेच्या नावाखाली मुख्याधिकारी यांनी त्यांच्या मर्जीतिल मे. समृद्धी फॅसिलीटी प्रा. लि. या कंपनीला दरमहा २५ लाख २८ हजार ४०० रूपये रकमेचा ठेका दिला आहे. या ठेक्यासाठी केवळ ५०० रूपये स्टॅम्प पेपरवर करार करण्यात आला असून त्यात ५६ अटी नमूद आहेत. मात्र, त्या केवळ कागदोपत्री राहिल्या असून कंपनीने कोणत्याही अटींचे पालन केलेले नाही, असा आरोप करण्यात आला आहे.




घाडगे यांच्या मते, मुख्याधिकारी आणि ठेकेदार कंपनी यांच्यात मिलीभगत असून, दरमहा लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करून नगर परिषदेच्या निधीची लूट केली जात आहे. शहरातील परिस्थितीही अतिशय दयनीय असल्याचे घाडगे यांनी नमूद केले. शहरातील नाल्या तुंबलेल्या आहेत, रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढीग पडलेले असून त्यातून दुर्गंधी येत आहे. किटकनाशक फवारणी होत नाही, आणि भाविकांना अस्वच्छ वातावरणातूनच मंदिरात जावे लागत आहे.

या संदर्भात नागरिकांनी व सोशल मीडियाद्वारे अनेकदा तक्रारी केल्या असूनही मुख्याधिकारी कोणतीही कारवाई करत नाहीत. त्यांना ठेकेदार कंपनीकडून आर्थिक फायदा होत असल्याने ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, असा आरोप घाडगे यांनी केला आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालून सखोल चौकशी करावी, मुख्याधिकारी व ठेकेदार कंपनीवर फौजदारी गुन्हे नोंदवावेत आणि अपहार केलेली रक्कम वसूल करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी तातडीने कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही घाडगे यांनी दिला आहे.

# गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहिदी समागमाची तयारी

## तुळजापूर येथे कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागातर्फे शीख पंथाचे नववे गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन मुंबई, नागपूर आणि नांदेड येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित कार्यशाळा नुकतीच तुळजापूर येथे शनिवारी संपन्न झाली.

या कार्यशाळेला आमदार बाबूसिंहजी महाराज (धर्मगुरू पोहरेदेवी), सुनील महाराज, जितेंद्र महाराज, क्षेत्रीय प्रांत प्रमुख महेंद्र रायचुरा, रामेश्वर नाईक (कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष) आणि राज्यस्तरीय समन्वय समिती सदस्य किसन राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या प्रेरणादायी भाषणात प.पू. बाबूसिंहजी महाराज म्हणाले, मुगल आक्रमण काळात अत्याचाराविरुद्ध उभे राहत **गुरु तेग बहादूरजींनी भारतीय संस्कृतीचे संरक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळेच त्यांना 'हिंद की चादर' म्हणून ओळखले जाते.

त्याचप्रमाणे रामेश्वरजी नाईक यांनी सांगितले की, धर्म व मानवतेच्या रक्षणासाठी सर्वस्व अर्पण करणारे गुरु तेग बहादूर साहिब हे भारतीय इतिहासातील महान बलिदानी संत होते. त्यांच्या शिकवणी समाजाला एकतेचा व सहिष्णुतेचा संदेश देते.

सूत्रसंचालन संतोष चव्हाण यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार प्रवीण पवार यांनी मानले. या कार्यशाळेला लातूर, बीड आणि सोलापूर जिल्ह्यातील आयोजन समिती सदस्य उपस्थित होते.

# येरमाळ्याची शरयू पाटील सीए इंटरमीडिएट परीक्षेत उत्तीर्ण

## पंचक्रोशीतील पहिली विद्यार्थिनी ठरली...

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ नोव्हेंबर -**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स ऑफ इंडिया (ICI) मार्फत घेतल्या जाणाऱ्या सप्टेंबर २०२५ मधील इंटरमीडिएट सीए परीक्षेत येरमाळ्याच्या शरयू पाटील हिने घवघवीत यश संपादन केले आहे.

सप्टेंबर २०२४ मधील सीए फाउंडेशन परीक्षेत यश मिळाल्यानंतर तिने इंटरमीडिएट परीक्षेची तयारी सुरू केली होती. सातत्यपूर्ण अभ्यास, विषयाचे सखोल ज्ञान, आत्म विश्वास आणि नियमित सराव हे यशाचे गमक ठरले असल्याचे शरयूने सिद्ध केले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



शरयू पाटील ही येरमाळा पंचक्रोशीतील सीए इंटरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण होणारी पहिली विद्यार्थिनी ठरली आहे.

तिचे शालेय शिक्षण बारामती येथील विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मिडीयम स्कूल (CBSE) येथे झाले असून सध्या ती पुणे येथील बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बी.एम.सी.सी.) या प्रथितयश महाविद्यालयात उच्च शिक्षण घेत आहे.

एक उत्तम चार्टर्ड अकाउंटन्ट बनून आर्थिक आणि व्यावसायिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करण्याचे तिचे स्वप्न आहे. आई-वडील आणि शिक्षकांच्या प्रोत्साहनासह सातत्यपूर्ण अभ्यासामुळे हे यश संपादन झाल्याचे शरयूने सांगितले.

ती येरमाळा येथील प्रा.डॉ. सुधीर पाटील यांची कन्या आहे.

# उद्धव ठाकरे यांचा मराठवाडा दौरा; शेतकऱ्यांशी साधणार संवाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे हे मराठवाड्याच्या नियोजित दौऱ्यावर येत असून या दौऱ्यात ते शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

दि.५ नोव्हेंबर रोजी ठाकरे खाजगी वाहनाने भूम तालुक्यातील पाथ्रुड येथे दुपारी २ वा., परंडा तालुक्यातील शिरसाव येथे दुपारी ३.३० वा., तसेच घारी (ता. बार्शी) येथे सायं. ५ वा. भेट देतील. सायं. ७ वा. ते धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहात पोहोचून धाराशिव, बीड व लातूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करतील.

दि.६ नोव्हेंबर रोजी ठाकरे धाराशिव येथून करजखेडा येथे प्रस्थान करून दुपारी १२ वा. भुसनी येथे भेट देतील.

त्यानंतर पुढील नियोजित दौऱ्याकरीता प्रयाण करतील, अशी माहिती शिवसेना कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# धाराशिवमध्ये गोवंश तस्कर पकडला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ नोव्हेंबर -**

धाराशिव शहर पोलिसांनी गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एका आरोपीस अटक केली आहे.

आरोपी साबेर बुर्हान कुरेशी (वय १९, रा. बुधवार पेठ, मोहोळ, जि. सोलापूर) हा बोलेरो (क्र. एमएच १४ एम ७५५९) वाहनात दोन जर्शी गायी व एक कालवड अशी सुमारे ७ लाख ५५ हजार रूपये किंमतीची जनावरे कत्तलीसाठी निर्दयपणे वाहतूक करताना अहिल्यादेवी होळकर चौकातील पुलाखाली पोलिसांच्या हाती लागला.

# तुळजापूर गुन्ह्यातील आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेची गजाआड; मोबाईल हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ नोव्हेंबर -**

३१ ऑक्टोबर रोजी तुळजापूर येथील गंभीर गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एक आरोपीला अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. अमोल मोरे यांच्या पथकाने पेट्रोलिंगदरम्यान गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली. तुळजापूर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गु.र.नं. ४०६/२०२५, कलम ३०४, ३(५)(बीएनएस) या गुन्ह्यातील आरोपी आणि चोरीस गेलेला मुद्देमाल शोधण्याचे काम सुरू



असताना, पथकाने तुळजापूर येथून आरोपी मनोज उर्फ पापा महादेव धोत्रे (वय ३०, रा. वेताळ नगर, तुळजापूर,) यास ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपीने नमूद गुन्हा आपल्या साथीदारासह केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून गुन्ह्यातील रेडमी कंपनीचा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला असून, आरोपीस पुढील तपासासाठी तुळजापूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोनि. विनोद इज्जपवार, सपोनि. अमोल मोरे, राहुल नाईकवाडी, समाधान वाघमारे, बळीराम शिंदे, अशोक ढगारे, विनायक दहिहांडे, योगेश कोळी तसेच सायबर पोलीस ठाण्याचे पो.अं. सुर्यवंशी व भोसले यांनी सहभाग घेतला.

# खेर्डा शिवारातून ११० क्विंटल सोयाबीन चोरी

## भाऊंनीच केली शिवीगाळ व जीव घेण्याची धमकी... कळंब पोलिसात तक्रार...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील खेर्डा शिवारात एका शेतकऱ्याचे ११० क्विंटल सोयाबीन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी फिर्यादीच्या नातेवाईकांविरोधात कळंब पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी बिभीषण सुखदेव लोकरे (वय ४० वर्षे, रा. खेर्डा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांचे खेर्डा शिवारातील गट क्र.४९, ७८, १०६, व १११ मधील एकूण १७ एकर शेतीतून ११० क्विंटल सोयाबीन, किंमत सुमारे ४ लाख १८ हजार रूपये आरोपींनी चोरून नेले.

या प्रकरणी भास्कर प्रल्हाद लोकरे, सुधाकर प्रल्हाद लोकरे, बबन प्रल्हाद लोकरे, कालीदास प्रल्हाद लोकरे, सुशांत भास्कर लोकरे, प्रमोद सुधाकर लोकरे व इतर (सर्व रा. खेर्डा, ता. कळंब) या आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी देत चोरी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



दि.२ नोव्हेंबर रोजी बिभीषण लोकरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भा.दं. सं. कलम ३७९, ३५२, ५०६ सह महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम ३ (५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# रविंद्र बारकुल यांची महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिक बोर्ड स्टाफ क्रेडिट सोसायटीच्या सचिवपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ नोव्हेंबर -**

कळंब तालुक्यातील येरमाळा येथील रविंद्र बारकुल यांची महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिक बोर्ड स्टाफ क्रेडिट सोसायटीच्या सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली असून, त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महावितरण कंपनीतील कर्मचारी बांधवांची महाराष्ट्रातील सर्वात मोठी सहकारी पतसंस्था म्हणून या सोसायटीची ओळख आहे. मराठवाडा कार्यक्षेत्र असलेल्या या संस्थेची बैठक दि.१ रोजी पार पडली. या बैठकीस सोसायटीचे सर्वेसर्वा व संस्थापक अध्यक्ष मारुती खामकर, चेअरमन देवानंद सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळ उपस्थित होते.

या बैठकीत सोसायटीचे संचालक म्हणून कार्यरत असलेले रविंद्र बारकुल यांची सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीनंतर संस्थेचे सर्वे सर्वा मारुती खामकर, चेअरमन देवानंद सुरवसे, नामदेव माळी, सत्यवान शिंदे, बालाजी आबा जावळे, नवनाथ काकडे, नामदेव कुंभार, बापू जगदे, सुनील कुचकर, बालाजी क्षीरसागर, राजेंद्र चव्हाण आदींनी त्यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सर्व संचालक मंडळ सदस्य, सोसायटीचे कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविंद्र बारकुल यांच्या निवडीनंतर येरमाळा परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जेवळी जि.प. गटात प्रणाली पाटील यांचे नाव चर्चेत

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ नोव्हेंबर -**

लोहारा तालुक्यातील जेवळी जिल्हा परिषद गटात सध्या सर्वत्र चर्चेत असलेले नाव म्हणजे



प्रणाली राजेंद्र पाटील. समाजकारण म्हणजे लोकसेवा हा विचार प्रत्यक्षात उतरवणारे त्यांचे पती व भाजप तालुकाध्यक्ष राजेंद्र अमृतराव पाटील हे जनसामान्यांशी थेट संवाद साधणारे आणि प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. या पार्श्वभूमीवर प्रणाली पाटील यांचे नाव जेवळी जिल्हा परिषद सदस्यपदाच्या प्रबळ दावेदारांमध्ये पुढे येत आहे. कर्तृत्व, समाजसेवा आणि नेतृत्वाचा संगम असलेल्या प्रणाली पाटील यांच्या रूपाने जेवळी गटाला एक कार्यक्षम, लोकाभिमुख आणि जनतेच्या मनातील जिल्हा परिषद सदस्य मिळणार, अशी चर्चा सध्या लोहारा तालुक्यात रंगत आहे.

# नाना-नानी पार्क व नगर पंचायत इमारत कामे ठप्प; राष्ट्रवादीकडून १५ दिवसांत काम सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ नोव्हेंबर -**

लोहारा शहरातील जुने तलाव परिसरातील नाना-नानी पार्क तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील नगर पंचायत इमारतीचे बांधकाम मागील दीड ते दोन वर्षांपासून बंद अवस्थेत पडून आहे. संबंधित कंत्राटदाराकडून शासनाने घालून दिलेल्या नियम, अटी व शर्तींचे पालन न करता मनमर्जीने कामकाज सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

कंत्राटदाराने अंदाजपत्रकानुसार काम केले का याची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नगर पंचायतचे अधिकारी व पदाधिकारी यांनी या कामांना पुन्हा सुरू करण्यासाठी कोणतीही ठोस हालचाल केली नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली. उलट संबंधित कंत्राटदाराला मुदतवाढ देऊन नगर पंचायतीकडून त्याला अभय दिल्याचा आरोप करण्यात आला.



मुदतवाढ मिळून दोन महिने उलटले असतानाही कंत्राटदाराने काम सुरू केलेले नाही. त्यामुळे यापुढे कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देऊ नये तसेच शासनाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याबद्दल संबंधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, पुढील १५ दिवसांत नाना-नानी पार्क व नगर पंचायत इमारतीचे काम सुरू न केल्यास संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, लोहारा शहर यांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा नगर पंचायत उपाध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष आयुब हबीब शेख यांनी दिला आहे.

# विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये भव्य प्रवेश; पक्षाची संघटनात्मक ताकद वाढली

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ नोव्हेंबर -**

उमरगा शहरातील काँग्रेस कार्यालयात विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांतील पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात भव्य जाहीर प्रवेश सोहळा व पदनियुक्ती समारंभ उत्साहात पार पडला.




या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव व उमरगा-लोहारा विधानसभा प्रभारी कल्याणजी पाटील, धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. धीरज पाटील, तसेच जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष व युवा नेते अशलेष मोरे प्रमुख उपस्थित होते.

याप्रसंगी शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तसेच इतर विविध पक्ष आणि सामाजिक संघटनांतील माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून पक्षाच्या ताकदीत भर घातली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा तालुका काँग्रेस अध्यक्ष अर्जुन बिराजदार होते. यावेळी जिल्हा सरचिटणीस विजय वाघमारे, तालुका कार्याध्यक्ष एम. ओ. पाटील, नाना भाऊ भोसले, मधुकर यादव, जिल्हा सचिव संजय सरवदे, शहराध्यक्ष विजय दळगडे, लोहारा तालुका अध्यक्ष शामसुंदर तोरकडे, ज्येष्ठ नेते ॲड. दिलीप सगर, ॲड. पोतदार, कार्याध्यक्ष अभिषेक औरादे, तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते ख्वाजा मुजावर, माजी नगरसेवक जयश्री संजय चव्हाण (शिंदे गट), संभाजी ब्रिगेड प्रवक्त्या रेखा सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती रजपूत, सचिन सुतके, महेश गायकवाड, योगेश माने यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

# डिकसळ येथे रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या पादुका पूजन व प्रवचन सोहळ्याला उत्साह

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ नोव्हेंबर -**

डिकसळ (ता. कळंब) येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलात जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज (दक्षिण पीठ, नाणीजधाम) यांच्या सिद्ध पादुका पूजन व प्रवचन सोहळ्याचे आयोजन दि.९ नोव्हेंबर रोजी, रविवार सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.



कार्यक्रमाच्या ठिकाणी भगवा ध्वज फडकवून व मंडपाचे भूमिपूजन दिंगबर कुंभार दांपत्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सरपंच पुष्पा धाकतोडे, नानासाहेब धाकतोडे, शीतल चोंदे, राहुल चव्हाण, विकास कदम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी जिल्हा निरीक्षक दत्ता घरत, संतोष केसकर, कल्याण बोराडे, विठ्ठल काटे आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

सकाळी ८ वाजता कळंब येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य शोभायात्रेला सुरुवात होणार असून, त्यात कलशधारी महिला, ध्वजधारी पुरुष, भजनी मंडळे व विविध पथके सहभागी होतील.

शोभायात्रेनंतर पादुका पूजन, प्रवचन व सामाजिक उपक्रम राबवले जाणार असून, जिल्ह्यातून ३० ते ४० हजार भाविक उपस्थित राहणार आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# आरळी सर्कल हे माझे कुटुंब

## खा. डॉ .अजित गोपछडे यांची भावनिक साद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ नोव्हेंबर-**

तालुक्यातील आरळी सर्कल हे माझे कुटुंब आहे आणि माझ्या कुटुंबाचा सर्वांगीण विकास करणे ही माझी जबाबदारी आहे. त्यामुळे आगामी काळात आरळी सर्कलमधील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले प्रामाणिक प्रयत्न असतील अशी ग्वाही देत खा. डॉ अजित गोपछडे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या तब्बल ३७ कोटी ५० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे काल सामान्य नागरिकांचे हस्ते भूमिपूजन करण्यात आले .याचवेळी कुंभारगाव येथे पार पडलेल्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. खा. डॉ. अजित गोपछडे यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला आहे. या भूमिपूजन आणि नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी खा. डॉ अजित गोपछडे यांच्यासह , राजेश देशमुख कुंटुरकर, उमाकांत पाटील गोपछडे, गणेशराव पाटील शिंपाळकर, अरविंद ठक्करवाड,हावगीराव गोपछडे, डॉ.हणमंतराव लखमपुरे, शिवराज बोधने,मारोती राहिरे,धोंडू सावकार, डॉ.कहाळेकर,विजय कुंचनवार, दिनेश दाचावार, हाजप्पा पाटील, वैभव खांडेकर, राजकुमार गादगे,राजेंद्र रेड्डी, हणमंतराव खरबाळे, शिवलिंग पाटील धावंडे, शिवाजी पांडागळे,संभाजी शेळके, आदित्य पाटील चोंडीकर,बालाजी कदम,अभिजीत धरमुरे, संदीप रामपुरे, राजेश खरबाळे, देविदास खेडे, रुपेश पाटील




भोकसखेडकर,दत्तराम पिल्लेवाड,बाबू पाटील तोरणा,लक्ष्मण पाटील कोळगाव, साईनाथ पाटील कोळगाव,राजु शिळेकर, अशोक पाटील भाले, दत्ताहरी नरवाडे,भाऊ पाटील कोळगाव,अविनाश स्वामी, लालबा दुमटकर,साहेबराव कांबळे, साहेबराव जिंके, यांच्यासह गावातील सर्व प्रमुख मंडळी गावकरी व आरळी भागातील व तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते,या कार्यक्रमाचे आयोजन व्यंकट शंकरराव पाटील नरवाडे यांनी केले होते,तर सुत्रसंचलन भाऊसाहेब बनबरे यांनी केले.

पुढे बोलताना खा. डॉ. अजित गोपछडे म्हणाले की , पंतप्रधान नरेंद्र मोदी , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देशात आणि राज्यात विकासाची गंगा सुरू आहे . प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकार काम करत आहेत मी अगदी सामान्य शेतकरी कुटुंबातला सर्वसामान्य कार्यकर्ता असतानाही केवळ तुमच्या पाठबळावर मला खासदारकी मिळाली आहे. त्यामुळे मिळालेल्या खासदारकीचा माझ्या भागातील प्रत्येक नागरिकाला लाभ झाला पाहिजे यासाठी माझा सततचा प्रयत्न आहे. जात धर्माच्या पलीकडे जाऊन आपल्या भागातील नागरिकांना अधिकाधिक सोयी सुविधा मिळवून देण्यासाठी माझा प्रयत्न आहे . आरळी सर्कल मध्ये दर्जेदार शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे यासाठी या भागात एक महाविद्यालय सुरू करण्याचाही आपला मानस आहे. शिक्षण ,पाणी ,आरोग्य , रस्ते , रोजगार या बाबींची पूर्तता करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील असेल. या भागातला शेतकरी , शेतमजूर आणि प्रत्येक माणूस हा स्वाभिमानी आहे . त्याचा स्वाभिमान कायम राहिला पाहिजे यासाठी त्याच्या हाताला रोजगार देण्यासाठी माझा प्रयत्न राहील असा विश्वास खा. डॉ . अजित गोपछडे यांनी यावेळी दिला .

आरळी सर्कलच्या विकासासाठी आपला कृती आराखडा तयार आहे. भविष्यात तो कृती आराखडा अंमलात आणण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असतील. कुंभारगाव- आरळी- कुंडलवाडी -नागनी या रस्त्यासाठी राज्य सरकारकडून २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे या भागात दळणवळणाची साधने आता मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतील . भविष्यातही या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टीचे सरकार कटिबद्ध आहे. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आपल्या भागातील विकासासाठी सदैव तत्पर असणाऱ्या भाजपाच्याच उमेदवारांना पाठबळ द्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**बॅकवॉटरमुळे होणाऱ्या नुकसानीवर तोडगा काढू**

आरळी सर्कलमध्ये ज्या बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्या बॅकवॉटरच्या प्रश्नावरही लवकरच तोडगा काढला जाईल .बिलोली , धर्माबाद, देगलूर आणि नायगाव या तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांना या बॅकवॉटरचा फटका बसतो. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांची एक संयुक्त बैठक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नंतर घेतली जाईल . त्या बैठकीत या बाधित शेतकऱ्यांना कायमस्वरूपी उपाययोजना केली जाईल, पांदन रस्ते विकासासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला असून याही बाबीचा फायदा आपल्या भागातील शेतकऱ्यांना होणार आहे. बारुळ तळ्याचे पाणी पूर्वी आरळी पर्यंत येत होते परंतु दरम्यानच्या काळात कालवा नादुरुस्त झाल्याने हे पाणी आरळी पर्यंत येत नाही. आता बारूळ तळ्याचा कालवा दुरुस्त करून पाणी आरळी पर्यंत आणण्यात येईल आणि याभागीतल कृषी सिंचनाचा प्रश्न कायमचा मार्गी लावण्यात येईल असा विश्वास त्यांनी दिला. मी आपल्या कायम ऋणात राहील अशी भावनिक सादही खा. डॉ . अजित गोपछडे यांनी घातली.

# श्रावण भिलवंडे यांच्या उमेदवारीने लोहगांव सर्कलमध्ये राजकीय खळबळ!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ४ नोव्हेंबर-**

लोहगांव जिल्हा परिषद सर्कलमध्ये राजकीय समी करणांचा पट पुन्हा एकदा हलला आहे. भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत माजी जिल्हा सरचिटणीस तथा नरसी येथील श्री .तुळजाभवानी जिनिंग फ्रेड्रेश नचे नूतन चेअरमन श्रावण भिलवंडे यांनी नुकताच जिल्हा परिषद निवडणुकीसाठी उमेदवारीचा अर्ज दाखल केल्यानंतर भाजपामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.



भिलवंडे यांच्या अर्जाची चर्चा होताच लोहगांव सर्कलमध्ये राजकीय तापमान चढले असून विरोधी पक्षातील नवखे उमेदवार आणि त्यांचे समर्थक यांच्यात स्पष्ट अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष जिल्ह्यातील मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेवर सत्ताप्रस्थापित करण्यासाठी मोर्चेबांधणी करत आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपाने सुरुवाती पासूनच अचूक रणनीती आखत विरोधकांना चकवण्याचे संकेत दिले आहेत.

नायगांव, बिलोली, धर्माबाद भागातून प्रबळ उमेदवारांची नावे अंतिम टप्प्यात असल्याची चर्चा सुरू असतानाच, लोहगाव सर्कलमधून श्रावण भिलवंडे यांच्या अर्जाने भाजपाच्या गोटात नवउमेद भरली आहे. श्रावण भिलवंडे हे गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाशी एकनिष्ठ राहून लोहगांव, कासराळी, तळणी, भोसी, चिंचाळा, डोणगाव खुर्द-बुद्रुक आणि रामपूर आदी गावांमध्ये पक्षकार्यकर्त्यांची मजबूत नाळ जोडून ठेवलेली आहे. त्यांच्या संघटनशैलीमुळे आणि जनसंपर्कामुळे भाजपाचे मुळ कार्यकर्ते पुन्हा एकदा एकवटलेले दिसत आहेत.

दुसरीकडे, माजी मंत्री तथा खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांचे पुतणे रवी पाटील खतगांवकर (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) आणि सध्याचे खासदार रविंद्र चव्हाण यांचे खंदे समर्थक शिवाजी पाटील पाचपिपळीकर (आ.भा. कॉ.) हे दोघेही उमेदवारीसाठी प्रयत्नशील आहेत. मात्र, भिलवंडे यांच्या नावाच्या चर्चेमुळे त्यांच्या समर्थकांमध्ये गोंधळ आणि अस्वस्थता निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. राजकारणातील अनुभवी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या श्रावण भिलवंडे यांनी लोहगाव सर्कलमध्ये आपली पकड मजबूत केली आहे. त्यांच्या राजकीय अनुभवासमोर नवखे उमेदवार उभे राहू शकतील का, हा प्रश्न आता सगळ्यांच्या चर्चेचा विषय बनला आहे. भाजपामध्ये उमेदवारी अर्ज सादर करताच भिलवंडे यांच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष केला असून लोहगाव सर्कलमध्ये भगव्या विजयाची चाहूल लागल्याची भावना व्यक्त केली जात आहे. आगामी काही दिवसांत या सर्कलमधील राजकीय घडामोडींना वेग येणार हे निश्चित असून श्रावण भिलवंडे विरोधकांना धोबीपछाड देऊन विजयाची पताका फडकवतात का, हे पाहण्यासाठी संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आता लोहगांवकडे लागले आहे.

## सम्राट आढाव यांचा वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश

**नवीन नांदेड** -आंबेडकर चळवळीतील युवा कार्यकर्ते सम्राट आढाव यांनी हाडको येथील स्वाभिमानी निर्धार मेळावा कार्यक्रम प्रसंगी युवकांचे आयकॉन सुजात आंबेडकर यांच्या उपस्थितीत वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश केला. हडको येथे आयोजित स्वाभिमानी निर्धार मेळाव्या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील युवा कार्यकर्ते सम्राट आढाव यांनी दिनांक १ नोव्हेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केला. आगामी स्वराज्य संस्थांनच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून स्वाभिमानी निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यास संबोधित करण्यासाठी युवकाचे आयकॉन सुजाता आंबेडकर हे उपस्थित होते. येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद या निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडी सक्षम असल्याचे सांगून निष्ठा म्हणताना तिकीट दिल्या जाईल असेही सांगितले. यावेळी युवा कार्यकर्ते सम्राट आढाव यांचा पक्षप्रवेश झाल्याने सिडको हडको परिसरातुन वंचित बहुजन आघाडीस सक्षम होण्यास मदत होईल. पक्षप्रवेश कार्यक्रम यावेळी प्रदेश प्रवक्ते फारूक अहमद, युवा प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे, शिवा नरंगले, प्रशांत इंगोले, श्याम कांबळे, विठ्ठल गायकवाड, विनायक गजभारे, सुखा सिंग टाक, सिद्धोधन कापसे आदी युवा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.




# हरवलेली बॅग महिलेस परत केली; हेअर ड्रेसर शेरकुरवार यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ४ नोव्हेंबर-**

माहूर बसस्थानकाजवळील एका हेअर कटिंग सलूनच्या दुकानासमोरील बाकड्यावर अज्ञातांची विसरलेली बॅग हेअर ड्रेसर प्रदीप शेरकुरवार यांना आज मंगळवार रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास दिसून येताच त्यांनी तातडीने माहूर पोलीस ठाण्याला माहिती देत जमा केली असता ह्या बॅगेचा शोध घेत आलेल्या नातेवाईक व्यक्तींना पोलिसांनी ती बॅग परत केली. या घटनेमुळे हेअर ड्रेसर प्रदीप शेरकुरवार यांच्या प्रामाणिकपणाचे व माहूर पोलीसांच्या कर्तव्यततपरतेचे सर्वत्र कौतुक होत असून, बॅगेच्या मुळ मालकांनी त्यांचे आभार मानले आहेत.



गीताताई कैलास राठोड रा.टेंडोळी ता.आर्णी जिल्हा यवतमाळ ह्या आपले पतीराज कैलास लक्ष्मण राठोड यांच्यासह खाजगी प्रवासी ट्रॅव्हल्सने पूणे येथून माहूर तालुक्यातील वाई बाजार या आपल्या माहेरी जात होत्या. माहूर येथे ट्रॅव्हल्समधून उतरल्यावर सदरील दांपत्यापैकी गीताताई या महिलेची बॅग ही प्रदीप हेअर सलूनच्या बाहेरच्या बाकड्यावर विसरली.

दरम्यान दुकानात मालक प्रदीप शेरकुरवार यांना सदरील बॅग निदर्शनास येताच त्यांनी पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्याशी संपर्क साधून याबाबत माहिती दिली. पोलीस नायक प्रकाश गेडाम यांनी तात्काळ जाय मोक्याच्या ठिकाणी भेट दिली असता व पोना गेडाम यांचे सोबत जात प्रदीप शेरकुरवार यांनी ती बॅग पोलीस ठाण्यात जमा केली. दरम्यान,वाई बाजार येथे माहेरी गेल्यावर गीताताई यांनी आपली बॅग हरवल्याचे अर्थात माहूर येथे सदरील दुकानाच्या बाकड्यावर विसरल्या चे लक्षात आले. त्यांचे नातेवाईक पतीराज कैलास राठोड व भाऊ मिथुन जाधव यांनी माहिती मिळाल्याप्रमाने माहूर पोलीस ठाणे गाठले व हरवलेल्या बॅगेसंदर्भात सविस्तर माहिती दिली, असता पोना प्रकाश गेडाम, हेअर ड्रेसर प्रदीप शेरकुरवार यांनी सदरील बॅग त्यांच्या सुपुर्द केली.

गत आठवड्यातच याच परिसरात भाविकाची ३ लाख ६० हजार रुपयांच्या मुद्देमालची हरवलेली बॅग येथील सायकल स्टोअर चे मालक यांनी मुद्देमालासह पोलीसांच्या व तेथून मुळ मालकास जशीच्या तशी परत केली होती, ही घटना ताजी असतानाच आजच्या या दुसऱ्या घटनेने माहूर शहरातील व्यापारी, व्यावसायिक हे किती प्रामाणिक आहेत याचे आणखी एक ज्वलंत उदाहरण पुढे आले असून,प्रवास करताना वा थांब्यावर उतरल्यावर प्रवाशांनी आपली व आपल्या सामानाची काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी माहूर येथे देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विनंतीवजा सूचना केली असून, माहूरकरांनी रोशन भाई व शेरकुरवार यांच्या प्रामाणिकपणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून भाविकांना अशीच सहकार्याची भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षपदी मंगेश पाटील जाधव यांची नियुक्ती

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ४ नोव्हेंबर-**



संभाजी ब्रिगेड पार्टी माहूर तालुका अध्यक्षपदी मंगेश पाटिल जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ०३ नोव्हेंबर रोजी या संदर्भातील नियुक्तीपत्र संभाजी ब्रिगेड पार्टी,जिल्हा अध्यक्ष नांदेड उत्तर कमलेश पाटील कदम यांनी त्यांना दिले आहे.

संभाजी ब्रिगेड या वैचारीक, सामाजिक व राजकीय चळवळीसाठी श्रम, वेळ, बुध्दी, कौशल्य व पैसा हे पंचदान देऊन पक्ष संघटनेत सातत्याने कार्यरत असल्याचे नियुक्तीपत्रात मंगेश पाटील जाधव यांच्या विषयी म्हटले असून,त्यांच्या या कार्याची विशेष दखल घेऊन जिल्हा अध्यक्ष कमलेश पाटील कदम यांनी त्यांची संभाजी ब्रिगेड पार्टी माहूर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. आपल्या विचारकार्यातून पक्ष संघटन व समाज संघटन बळकट होईल.महामानवांच्या विचारांची समतावादी व्यवस्था निर्माण होण्यासाठी आपले योगदान महत्वाचे ठरणार असल्याचा विश्वास जिल्हाध्यक्षांनी व्यक्त केला आहे.

अटी व शर्तीच्या अधिन असलेली ही नियुक्ती केवळ सहा महिन्याच्या कालावधीसाठी असून या काळातील कामगिरीचा आढावा घेऊन पुढील काळासाठी ही नियुक्ती कायम करण्यात येणार आहे. संभाजी ब्रिगेड पार्टीचे नवनियुक्त माहूर तालुका अध्यक्ष मंगेश पाटील जाधव यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा,कमलेश पाटील कदम जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, नांदेड़ उत्तरयांनी दिल्या आहेत. तर या नियुक्ती बद्दल माहूर/किनवटसह परिसरातील स्नेहांकितांकडून मंगेश पाटील जाधव यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## शिवाजीराव जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

**नांदेड** -जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी तालुका मुखेड जिल्हा नांदेड चे अध्यक्ष तथा मुखेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शिवाजी नागोराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त शिवरायनगर मालेगाव रोड तरोडा खुर्द येथील त्यांच्या निवासस्थानी मित्रमंडळीसह राजकीय पक्षातील नेते पदाधिकारी, पत्रकारांनी प्रत्यक्ष भेटून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील एक प्रभावी आणि आदर्श अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले शिवाजीराव जाधव उमरदरीकर, सर्व परिचित असल्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, विधीज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आदी सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून व व्हाट्सअप, च्या माध्यमातून शिवाजीराव जाधव यांना शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजीराव कल्याणकर, माजी आ.मोहन अण्णा हंबर्डे, एकनाथराव कल्याणकर, नांदेड अभिवक्ता संघाचे माजी अध्यक्ष अँड. सतीशराव पुंड,अँड. विजयकुमार भोपी,किसनराव कल्याणकर, माधव पावडे, पप्पू जाधव,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, प्रा.डी.बी जांभरुणकर, नेताजीराव भोसले,प्रा. मजरोद्दीन, माधवराव कल्याणकर, नारायणराव गायकवाड, सुभाषराव रावणगावकर, शिवसेनेचे शंकरराव लुटे बालासाहेब मादसवाड,प्रा.सौ. प्रांजली रावणगावकर, अँड. बाळासाहेब मोरे, शकुंतला पब्लिक स्कूलचे अध्यक्ष गिरीषराव जाधव, प्रा.यशवंत कांबळे, पांपटवार, चंद्रकांत घाटे,अँड. लक्ष्मण सोमवारे ,राष्ट्रवादी काँग्रेसचे, मुखेड विधानसभा अध्यक्ष शंकरराव इंगळे, स. रणबीरसिंग खोकर, स.टहेलसिंग शाहू, स.नानसिंग घडीसाज, स.नारायणसिंग तबलेवाले,स.प्रेम्जितसिंग टेलर, स.गरूबचनसिंग बंड, स.अजितसिंग मंचरियालवाले,शिवकुमार देवकते, सुरेश चंदावाड, शादुल होणवडजकर, कैलास मादसवाड, प्रा.डॉ. गणेश जोशी, डॉ.अभय दांडगे, रमेश पांडे, रमेश चित्ते, प्रशांत गवळे,विजय मंगरुळे, श्रीधरराव कदम, योगगुरू सिताराम सोनटक्के, किशोर पसलवाड, मंगेश खंडागळे, आर.आर.यवतीकर, अबास काझी, विकास गजभारे,जीवन वडजे पाटील यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या.



## माजी पोलीस पाटील भीमराव कांबळे यांचे निधन

**मुदखेड** -मुदखेड शहरातील भीमनगर येथील माजी पोलिस पाटिल तथा बौद्ध उपासक का.भिमराव संभाजी कांबळे यांचे दि.४ नोव्हेंबर रोजी सकाळी ३:३० वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७१ वर्ष होते त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी मंगळवार दि.४ नोव्हेंबर रोजी दुपारी ४:३० वाजता भिमनगर येथील बौध्द स्मशान भूमी येथे करण्यात आला आहे. सचिन भिमराव कांबळे, सुमेध भिमराव कांबळे, दै.मराठवाडा केसरी तालूका प्रतिनिधी धम्मदाता भिमराव कांबळे यांचे ते वडील होत.



## किनवट शिक्षण संस्था कार्यकारीणी मंडळाची सभा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ नोव्हेंबर-**

किनवट शिक्षण संस्था किनवट यांची कार्यकारिणी मंडळाची महत्वाची सभा संस्थेच्या बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा येथे संपन्न झाली. या सभेत विविध प्रशासकीय व निवडणुकीसंबंधी महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

सभेअंती धर्मदाय उपायुक्त, नांदेड यांच्या आदेशानुसार चौकशी क्रमांक ८४८/२५ प्रमाणे निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर विद्यमान कार्यकारिणीचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने नव्या कार्यकारिणी मंडळाच्या निवडणुकीसाठी सर्वसाधारण सभेचे आयोजन दिनांक २३ नोव्हेंबर, रविवार या दिवशी घेण्यात येईल, असा ठराव सभेत सर्वसंमतीने मंजूर करण्यात आला.



सभा, नारायणराव सिडाम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी संस्थेचे सचिव शंकरराव चाडावार, इसा खान सरदार खान, अल्लाबक्ष अबदुल रज्झाक, दिनकरराव चाडावार, ठाकुर नारायण जाधव, जसवंतसिंग सोखी यांची उपस्थिती होती. सभेचे संचालन सचिवांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेच्या सदस्यांनी केले. या सभेमुळे आगामी कार्यकारिणी निवडणुकीसाठी संस्थेमध्ये नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सगरोळी पं. स. गणातून भारतीय जनता पक्षाकडून मुतेपोड रवी सायन्ना इच्छुक

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ४ नोव्हेंबर-**

आगामी होत असलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे लवकरच बिघून वाजणार असून बिलोली तालुक्यातील सगरोळी मतदार संघातून विविध पक्षाचे कार्यकर्ते निवडणुकीसाठी समोर येत आहेत सगरोळी पंचायत समिती गण हा अनूसुचित जमातीसाठी राखीव झाला असून या गणातून सगरोळी येथील मुतेपोड रवी सायन्ना यांनी निवडणूक लढवण्याची इच्छा भारतीय जनता पक्षाकडे व्यक्त केले आहे.

मुतेपोड रवी सायन्ना हे कार्यकर्ते व लक्ष्मणराव ठक्करवाड यांचे कट्टर समर्थक असून ते सगरोळी पंचायत समिती गणातून आनुसुचित जमातीसाठी राखीव झालेल्या जागेवर निवडणूक लढवण्यासाठी तयारी दर्शविली आहे.दिवंगत आमदार गंगाराम ठक्करवाड यांचे कट्टर समर्थक समजल्या जातात मुतेपोड रवी सायन्ना हे भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते असून त्यांनी पक्षाची ताकद ग्रामीण भागात मजबूत केले असून त्यांचा सामाजिक कार्यात मोठा अग्रेसर असतो सगरोळी पंचायत समिती गणातून भारतीय जनता पक्षाकडून तिकीट मागणी करीत आहे व ग्रामीण भागातील सरपंच, उपसरपंच, चेअरमन, सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य यांच्याशी त्यांचा दांडगा संपर्क असल्यामुळे ते लोहगाव पंचायत समिती गणा मधून इच्छुक उमेदवार म्हणून जनसामान्यातून त्यांना पसंती मिळत असल्याचे बोलले जात आहे.



# श्रीदत्त प्रभूच्या ४१ किलो चांदीच्या मूर्तीची हादगाव शहरातून शोभायात्रा

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ४ नोव्हेंबर-**

हदगाव शहरातून ४१ किलो चांदीच्या श्री दत्तप्रभू च्या मूर्तीची शोभायात्रा बँड पथक भजनी मंडळ २१ घोडे व हदगाव तालुक्यातील महंत - संत भगव्या पताका व ध्वज अशी भव्य दिव्य मिरवणूक हदगाव शहरातून सकाळी ११ वाजता शिव पार्वती मंगल कार्यालयातून निघून पूर्ण हदगाव शहरातून शोभा यात्रेचे दत्तबर्डी देवस्थान येथे विसर्जन झाले.

या शोभायात्रीत हदगाव तालुक्यातील आ. बाबुराव कोहळीकर, माजी खा. सुभाष वानखेडे यांच्यासह हदगाव तालुक्यातील हजारोचा जनसमुदाय या शोभायात्रेत होता.

या शोभायात्रेत आर्य समाजाच्या वतीने पाणी व फळाचे आयोजन करण्यात आले होते.

तालुक्याचे दैवत असलेल्या श्री दत्तात्रय संस्थान दत्तबर्डी येथील प्रसिद्ध मंदिरात श्री श्री १००८ महंत श्रीगोपाळगिरी महाराज यांच्या अधिपत्याखाली दत्त मूर्तीचा जिर्णोद्धार सोहळा ५ नोव्हेंबर रोजी होणार असून त्यानिमित्त दिनांक २९ ऑक्टोबर रोजी बुधवारपासून दत्तनाम सप्ताहाला सुरुवात झाली आहे.



हदगाव शहरालगत दत्तबर्डीच्या टेकडीवर श्री दत्तात्रयाचे पुरातन मंदिर आहे. या मंदिराला शेकडो वर्षाची परंपरा आहे. दत्तात्रयांचे हे मोठे घर म्हणून ओळखले जाते. या मंदिरात अनेक वर्षांपूर्वी बनवलेली मूर्ती आहे या मूर्तीला बदलण्याची गरज असल्याचे सर्व भक्त गणांच्या आणि खुद्द श्री श्री १००८ महंत महाराजांच्या लक्षात आले. त्यासाठी दत्त भक्तांची बैठक घेऊन सर्वांच्या सहयोगाने महंत श्रीगोपाळगिरी महाराजांनी ४१ किलो चांदीची मूर्ती बसवण्याचा संकल्प केला. त्यासाठी सर्व दत्त भक्तांनी सढळ हस्ताने देणगी सुद्धा दिली. एक दत्त भक्त श्री सुभाष शुगर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांनी मूर्तीसाठी मोलाचा हातभार लावला. दत्त भक्तांनी गावागावातून वर्गणी करून या मूर्तीसाठी देणगी दिली तर काही दत्तभक्तांनी पाच हजार, अकरा हजार, एकेविस हजार ते एक लाख, सव्वा लाख रुपये पर्यंत देणगी दिली. सर्व दत्त भक्तांच्या देणगीतून ही ४१ किलो चांदीची मूर्ती बनवण्यात आली असून जुन्या मुर्तीच्या ठिकाणी तिची स्थापना आणि प्राणप्रतिष्ठा येत्या ०५ नोव्हेंबर रोजी बुधवारी करण्यात येणार आहे. या दत्त मूर्तीच्या जिर्णोद्धार कार्यक्रमानिमित्त दि. २९ ऑक्टोबर रोजी बुधवार पासून दत्त नाम सप्ताहास सुरुवात करण्यात आली आहे. बुधवारपासूनच हदगांव शहराजवळ दत्तबर्डी संस्थान येथे भाविकांची मोठी गर्दी होत आहे. यामध्ये दुरवरून येणारे दत्तभक्त या सप्ताह निमित्त सात दिवस हदगावांत दत्तभक्तीत लिन होतांना दिसत आहेत या सप्ताह निमित्त येणाऱ्या दत्त भक्तांच्या राहण्याची व महाप्रसाद रुपाने भोजनाची सर्व व्यवस्था सातही दिवस हदगांव परिसरातील वेगवेगळ्या गावच्या भक्तमंडळी कडून करण्यात येत आहे. तर हडसणी येथील गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले आहे. मुर्ती स्थापनेच्या दिवशी श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड या साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख रा. ढोकी ता. जिल्हा धाराशिव आणि कार्यकारी संचालक सुशिलकुमार देशमुख यांच्याकडून महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**ऐतिहासिक क्षणाचे आपण साक्षीदार व्हा**

दत्त बर्डीच्या टेकडीवर असलेल्या दत्तात्रयाचे जागृत देवस्थान असून पुरातन मंदिर आहे या मंदिराला शेकडो वर्षाची परंपरा लाभली असून याच ठिकाणी ४१ किलो चांदीच्या श्री दत्तप्रभू च्या मूर्तीचा जीर्णोद्धार सोहळा आयोजित केला असून हा क्षण ऐतिहासिक असून या क्षणाचे आपण साक्षीदार व्हा असे अवाहन माजी खासदार सुभाष वानखेडे व आमदार कोहळीकर यांनी दत्तभक्तांना केले आहे.

जिल्हा कार्यालय - पहिला माळा, जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड. Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439